# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



ोबर १९८१ | श्री साईबाबा पुण्यतिथी विशेषांक [ किंमत १ रु.

श्री ... वाचनालय

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

३०४

श्री साईनाथ ग्रंथालय
श्री साईबाबा संस्थान, शिर्डी

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :
**श्री.क.हि.काकरे**
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

**श्रीसाई वाक्सुधा**

६० वे )　　किंमत एक रुपया　　( अंक ७ वा

आक्टोबर १९८१

## श्रीसाईबाबा पुण्यतिथी विशेषांक
### बालसाहित्य खास अंक

: कार्यालय :
साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४३२६१
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥



# श्रीसाई वाक्सुधा

जैसा रोग तैसें निदान ।
तैसेंच औषध वा अनुपान ।
सद्गुरु नेमी शिष्या लागून ।
भवरोग निवारण कार्यार्थ ॥११२॥

स्वयें तोजी करितो करणी ।
आणूं नये आपुले अनुकरणीं ।
तुम्हां कारणें गुरु मुखांतूनी ।
निघेल ती वाणी आदरावी ॥११४॥

त्याच शब्दांवर ठेवावें मन ।
तयांचेंच नित्य करावें चिंतन ।
तेंच तुमच्या उद्धारा कारण ।
ठेवा हें स्मरण निरंतर ॥११५॥

गुरु सांगे तें पोथी पुराण ।
तें सों तद्वचन–स्पष्टी करण ।
मुख्य उपदेशीं ठेवा ध्यान ।
तें निगम ज्ञान आपुलें ॥११६॥

कोणाही संताचे वचन ।
त्याचा करूं नये अवमान ।
आपुली माय आपुली जतन ।
करील ती अन्यकोण करी ॥११७॥

—श्रीसाईसच्चरित–अध्याय ४४ वा



तूंचि मम माता माऊली ।
सदाकृपेची तू सावली ।
तुझिया चरणा घातली ।
काया मम ॥

शक्ती माता तूंचि ।
भक्ती माता तूंचि ।
मुक्ति माता तूंचि ।
भक्त कल्पद्रुमा ॥

महिषासूर मर्दिनी माते ।
जगरूपे जगशांते ।
जगमाते ।
जगन्माते नमन तुज ॥

तूंचि रेणुका माहूरची ।
महालक्ष्मी करवीरची ।
तुळजापुरी दुर्गा तूंची ।
स्थळमहात्म्य होय ॥

ऐसी ही तीन पीठे ।
दर्शन होता पावन होते ।
भक्तांसी नवसा पावते ।
तूंचि माते ॥

# अनुक्रमणिका—ऑक्टोबर १९८१

३०७


१) संपादकीय

२) महाराष्ट्रातील साडेतीन शक्ती पीठे — साईनंद

३) शिरडीतील श्री खंडोबाचे मंदिर — सदानंद चेंदवणकर

४) कुठेही जा दुनियेवर मी तो तुम्हाबरोबर — कुमार अमोल पितळे

५) बाबा अशीच कृपा ठेवा — कुमार राहुल खानविलकर

६) शिरडीचा रमणीय परिसर — कुमारी सुहासिनी कोल्हटकर

७) बाबांनी टी. व्ही. सेंटर दाखविले — कुमार विकास वखारे

८) उदी हेच औषध — कुमार प्रशांत पाटील

९) भक्ती — कुमारी सुषमा गर्जे

१०) आमुची साई माऊली — कुमार रत्नाकर मुळीक

११) साईतारी त्याला कोण मारी — कुमार अरविंद नलावडे

१२) श्रद्धा आणि सबुरी — कुमारी सीमा कर्वे

१३) शिरडी माझे आजोळ — कुमार श्रीकांत जेऊरकर

१४) श्रीबाबांची उपदेशवाणी — कुमार सुरेश घुरी

१५) माझे साईबाबा — कुमारी निता सहामते

१६) माझ्या आधी बाबा जाऊन पोचले ! — कुमार सचिन कर्णिक

१७) मी आहे साईबाळ — कुमार गौरव स्वादीया

१८) श्रद्धा व सबुरी — कुमार निशिकांत पेडणेकर

१९) असाच हाही एक अनुभव — कुमार आशिष हजारे

) दर्शन — राहुल खानविलकर

) बोला जय साई साई — कुमारी यामिनी कोळमकर

) बाबांचे श्रीमुख पाहूया — कुमारी निलम दोशी

) माझ्या साई — हेमंत कुळकर्णी

) साईनाथ करावे नमन — कुमारी नेत्रांजली दोशी

) मशिदीत प्रगटला साई जगदिश्वर — कुमार राजन पोतनीस

) साई माझा — कुमार सौरभ शहाणे

) माझे साईबाबा — कुमार सत्येंद्र कुलकर्णी

) पूजा करूं मा केवल तेरी — कुमार दिपक पटवारी

) साई महिमा — कुमार अतुल चावरे

) साईगीत तुषार — श्री. सुहास देसाई

) शिरडी वृत्त — ऑगस्ट ८१

# श्रीसाईबाबांची ६२ वी पुण्यतिथी




संत चूडामणि भगवान श्रीसाईबाबांच्या ६३ व्या पुण्यतिथीच्या सुमारासच साईभक्त साईप्रेमी वाचकांच्या हातात श्रीसाईलीलेचा अंक देताना आम्हास आनंद होत आहे. हा अंक बालविशेषांक म्हणून प्रकाशित करीत आहोत. बाबांना मुलेही आवडायची फुला मुलांना ते आपल्या हातून बर्फीचा प्रसाद देऊन उदी लावून शाबासकी देत असत. मुलांवर ते कधीच रागावले नाहीत. कुणा भक्ताबरोबर जर त्याची मुले बाळे आली तर भक्तापेक्षा त्यांच्या बरोबरच्या मुलांची ते जास्त विचार पूस करीत असत. आपल्या चर्मचक्षूंनी श्रीबाबांचे दर्शन घेतलेल्या अनेक भक्तांनी आम्हाला हे सांगितले आणि म्हणूनच की काय बाबांच्या आवडत्या, लाडक्या बालगोपाळ मंडळींनी बाबांच्या बद्दलच्या लिहिलेल्या साहित्याचा हा अंक आपल्या समोर ठेवीत आहोत. तो मुलांच्या प्रमाणेच मोठ्यांनाही आवडेल अशी आशा व्यक्त करतो. या बालसाहित्य विशेषांकाबद्दल अभिप्राय मात्र वाचकांनी अवश्य पाठवावेत, म्हणजे अशा प्रकारचा अंक भविष्य कालात पुन्हा काढावा की नाही याबद्दल विचार करणे सोयीचे होईल.

## विश्वधर्माचा सागर–भगवान श्रीसाईबाबा

● परस्परात प्रेमभाव व सलोखा निर्माण करणाऱ्या विश्वधर्माची आज फार जरूरी आहे. परस्परांबद्दल प्रेमभाव वाटला पाहिजे. सारखेपणाशिवाय, समानध्येयाशिवाय एकमेकांची ओढ लागत नाही. सर्वांतर्यामी एकच चित्शक्ती वास करीत आहे ही गोष्ट प्रत्येकाच्या मनाला पटली पाहिजे व ती परोपरीने पटवून देण्यात आली पाहिजे. विश्वधर्माशिवाय तंटे बखेडे, मत्सर व आपसातील चुरस नाहीशी होणार नाही ही गोष्ट स्वामी विवेकानंद यांस पूर्णपणे पटली होती. त्यांना त्या काळीही जागतिक शांततेची आत्यंतिक तळमळ लागून राहिली होती. त्यासाठी त्यांचा जीव तीळ तीळ तुटत असे. या गोष्टीचे चिंतन ते अहर्निश करीत असत. हे कार्य त्यांच्या हातून जरी तडीस गेले नाही तरी त्यांनी विचारांचा जो बहुमोल ठेवा भारतास देऊन ठेवला आहे त्याचा योग्य उपयोग करणे जरूर आहे.

कोणी काय करावे व करू नये, कोणाचे काय कर्तव्य आहे वा नाही, याचा उहापोह करण्यापेक्षा अशा प्रकारचे कार्य आपणास करिता येईल की काय कि

अन्य कोणी असा प्रयत्न केला असल्यास त्यास सहाय्य करून या कार्याची वाढ करता येईल की काय याचा विचार करणे अधिक महत्वाचे आहे. स्वामी विवेकानंद यांचे कार्य विश्वधर्माला पोषक होते. तेच स्वामींचे कार्य शिर्डीच्या श्रीसाईबाबांनी पूर्णत्वास नेले व नवीन आचार धर्माचा पाया घालून दिला आहे. याचा विचार भक्तांनी करावयाचा आहे. पण तत्पूर्वी मानवता म्हणजे काय, तिचा नाश कशामुळे होतो, तिची निर्मिती कशामुळे होऊ शकेल याचा विचार करणे आहे कारण मानवता व विश्वशांती ही एकत्र नांदत असतात.

वास्तविक माणसात माणुसकी उपजतच असते. आपलेपणा दया, अनुकंपा, सहानुभूती वगैरे माणुसकीचे गुण उपजतच असतात. माणुसकीचा उगम भावनेत आहे. बुद्धीत नाही. भावना ह्या जशा उपजत असतात तशा त्या परिस्थितीनेही बनत असतात. बुद्धी भावनेला मारक आहे. यामुळे बुद्धीनिष्ठ गोष्टीत भावनेला थारा नाही व भावनाप्रधान गोष्टीत बुद्धीला वाव नाही. दोघांचे एकाच वेळी एकाच ठिकाणी अस्तित्व असू शकत नाही. बुद्धीत भेदत्व व एकत्व आहे. एकत्वाचे परिच्छेदन करण्याची तिला सवय आहे. (सारासार विचार शक्ती). यामुळे बुद्धी ही पुष्कळवेळा एकत्वाला–एकीला विघातक होते. बुद्धीला परिच्छेदनाची जशी सवय आहे तशीच विश्लेषणाचीही सवय आहे. मनुष्यात अहंकार आहे. अहंकाराची दृष्टी स्वार्थी आहे. अहंकार बलवान झाला की बुद्धीवर ताबा चालवतो म्हणजे आपल्याला सोईस्कर असे कार्य तिच्याकडून घडवून आणतो व ते न्याय्य आहे असे भासविण्यास तिला लावतो. अहंकाराच्या ठिकाणी मालकी हक्काची जाणीव तीव्र असते. याचा अर्थ असा की माणसातील एकत्व बिघडवणारी भेद निर्माण करणारी मुळात बुद्धी ही नसून अहंकार आहे.

अहंकार माणुसकीचा खरा मारेकरी आहे. अहंकार व्यक्तीला समाजापासून निराळा करतो. मालकी हक्काच्या भावनेमुळे माझे तुझे हा भेदद्वैत निर्माण होऊन एकत्वाचा भंग होतो. यामुळे स्वार्थ बळावून माणूस सत्तेच्या मागे धावू लागतो. अहंकाराचा आहार कधीही न शमणारा असल्यामुळे ही धाव सतत चालूच राहते. आपली सत्ता आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या क्रमात माणूस चूर होऊन जातो. स्वार्थ व सत्तेने त्याची बुद्धी आंधळी बनते. इतर गोष्टी चांगल्या असल्या तरी त्याला त्या दिसत नाहीत, समजत नाहीत, उमजत नाहीत व पटत नाहीत. स्वसत्ता स्थापनेसाठी नाना स्वार्थी युक्त्या व प्रयुक्त्या व मार्ग शोधण्यातच त्याची बुद्धी सदैव खर्च होत असते. या वृत्तीमुळे इतरांशी मतभेद होतात. इतरांकडून अडथळे निर्माण होतात. यातून काम, क्रोध, द्वेष, असूया, हेवेदावे निर्माण होऊन माणसातील

माणुसकी मरते व तंटेबखेडे माजून अंति यादव्या माजून लढाया होऊन विश्वशांती व तिच्याबरोबर इतर चांगल्या गोष्टी यांची राखरांगोळी होऊन जाते. या सर्वांचे मूळ अहंकार असल्यामुळे त्याची प्रथम व्यवस्था केल्याखेरीज माणुसकीची–मानवतेची वाढ होणे शक्य नाही.

अहंकार हा जसे विध्वंसक कार्य करतो तसे तो विधायक कार्यही करतो. अहंकाराच्या अंगी बडाडी धैर्य व साहस ही असतात. जे काही जगात चांगले झाले आहे ते मानवास अहंकाराने करावयास लावले आहे. अहंकाराच्या पोटी क्रियाशक्ती कार्य प्रवीण करणारी आहे. माणसात मुळीच अहंकार नसेल तर माणूस क्रियाशून्य बनेल. वास्तव माणसाचे व्यवहार चालू राहण्यास अहंकाराची जरूरी आहे. विधायक व विध्वंसक दोन्ही कार्य अहंकाराकडून होत असतात. यामुळे अहंकार नसावा हे जितके खरे आहे तितकेच तो असावा हेही खरे आहे. धरले तर चावते व सोडले तर पळते असा हा पेंच आहे. तो सोडविला तरच मानवता व जागतिक उन्नती दोन्ही साधू शकतील.

हा तारेवरचा खेळ कसा साधावयाचा ? कामाला मस्त बैल सर्वात उत्तम. वास्तव त्याला बडवून त्याची खच्ची करून मग कार्यास लावतात, यामुळे त्याची शक्ती कामास लागून कार्य होते. अहंकाराच्या बाबतीत असाच प्रकार आहे. त्याला चांगला बडवावा लागतो. त्याची खच्ची करावी लागते. अहंकाराला गुलाम म्हणून राबविला पाहिजे. त्याच्या आहारी जाता कामा नये. ही गोष्ट कशी साधावी याचे मार्गदर्शन अध्यात्मशास्त्रात आहे. दखल विश्वशांती स्थापनेच्या योजनेत घेणे आवश्यक आहे.

येथपर्यंत माणसांतील माणुसकीचा-मानवतेचा नाश मुख्यतः कशामुळे होतो, याचा विचार झाला. परंतु हा झाला नास्तिपक्षी विचार, त्याने कार्यनिष्पत्ती होऊ शकत नाही. यामुळे अस्तिपक्षीही विचार करणे जरूर आहे. कोणत्या गोष्टीमुळे माणुसकीची वाढ व्यक्तीत होऊ शकते याची दखल घेणे आवश्यक आहे.

माणुसकीचा जन्म आपलेपणाच्या पोटी होत असतो. केवळ एका ध्येयावर आधारलेला आपलेपणा एकत्व टिकू शकत नाही. ध्येयप्राप्तीनंतर हा आपलेपणा मावळतो. या गोष्टीची भारतीय इतिहासात अगदी ताजी साक्ष आहे. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी जे लोक एकदिलाने, निष्ठेने व आपलेपणाने एकत्रित आले तेच ध्येयप्राप्तीनंतर मतभेदांमुळे विलग झाले व त्यांच्यातील आपलेपणा मावळला, भंग पावला, वास्तव

टिकाऊ आपलेपणाची बैठक केवळ समान ध्येयावर आधारली न जाता माणसा-माणसात असू शकणाऱ्या एखाद्या समान गोष्टीवर अधिष्ठित असेल तर तो टिकाऊ होईल; ज्यावेळी पतिपत्नीमध्ये विषयवासना बगळता एकमेकांबद्दल एक विशिष्ट ओढ निर्माण होते, त्यांच्यात एक विशिष्ट प्रेमवा आपलेपणा निर्माण होतो त्यावेळी ती एकरूप होऊन एकमेकांच्या सुखासाठी झटत असतात; स्वार्थत्याग करीत असतात व यामुळे त्यांचा संसार हा सोन्याचा संसार होतो. कोणतीतरी अंतर्गत शक्ती त्यांना एकमेकांकडे ओढते. त्यांच्यात एक प्रकारचा आपलेपणा निर्माण होतो. मुलांच्या ठिकाणी मातेची असणारी ओढ–वात्सल्य ही एकत्वाचीच साक्ष आहे. मातेच्या ठायी मुलाबद्दल एक प्रकारचे शुद्ध पवित्र प्रेम वास करीत असते. त्यामुळे मातेच्या स्वार्थत्यागास सीमा नाही. निष्पाप व निर्व्याज प्रेमाने भरलेल्या अशानी बालकाच्या ठिकाणी या अंतर्गत शक्तीचा तीव्रपणा विशेष असल्यामुळे मातेलाच नव्हे, तर इतरांनाही बालक झटकन् आकर्षित करते. अशा प्रकारची ओढ माणसामाणसात निर्माण झाली की माणुसकी उदयास आली म्हणून समजावे. आपण जातिधर्माने, बुद्धीने, शरीराने निराळे असलो तरी आपण सर्व मानवात जातीधर्म निरपेक्ष अशी एक गोष्ट एक शक्ती समान आहे. याची जेव्हा माणसास जाणीव होईल तेव्हा त्यांना एकमेकांबद्दल आपलेपणा वाटू लागेल व त्याच वेळी खरी माणुसकी उदयास येईल व मग माणसे एकमेकांच्या सुखासाठी झटू लागतील व विश्वशांतीचे स्वप्न साकार होईल. वास्तव मानवांना त्यांच्यातील एकत्वाची जाणीव करून देणे, ही जाणीव करून घेण्यास मानवाना प्रवृत्त करणे हे विश्वधर्माचे प्रमुख कार्य असले पाहिजे.

अशा प्रकारची जाणीव निर्माण होण्यास काही तरी नियोजनबद्ध मार्ग असला पाहिजे. केवळ व्याख्याने वा प्रवचने या योगे ही गोष्ट साध्य होणार नाही. आचरण होऊ शकेल, जे गुण ही जाणीव देण्यास कारणीभूत होतील अशा गुणांची वाढ ज्या योगे होईल अशा गोष्टी करण्यास लावणारा आचारधर्म पाहिजे. अहंकार स्वार्थ, लोभ वगैरे ऐवजी क्षमा, शांती, दया, दान व दमन या गुणांची वाढ झाली पाहिजे. गीतेत सांगितलेली दैवी संपत्ती कमावली पाहिजे. हे ज्यायोगे साधेल असा आचारधर्म जरूर आहे. उठल्यापासून निजेतोपर्यंत माणसाने काय करावे व कसे वागावे याचा पायरी पायरीने आखणी केलेला आचारधर्म पाहिजे. माणुसकी हे तत्व नसून ती वागणूक आहे. याला डावलणारा आचारधर्म विश्वशांतीस उपयोगी नाही. हा आचारधर्म जागतिक स्वरूपाचा असल्यामुळे तो जनतेला अर्थहीन असलेल्या अशा विद्वत्ताप्रचुर जाड्या शब्दांच्या वेष्टनात गुंडाळलेला नसावा. एखाद्या रानवट्यालाही समजेल अशा साध्या सुध्या भाषेत तो व्यक्त केलेला असला पाहिजे. नाहीतर अर्थासाठी वादावादी होऊन तंटेबखेडे माजतील सर्वच मुसळ केरात जाईल, जगातील माणसा-

तील बरीचशी कटुता बेजबाबदार जिभेमुळे निर्माण होत असल्याने प्रथम आपल्या जिभेवर माणसाने ताबा मिळविला पाहिजे. दया, दान म्हणजे त्याग याची संवय जडली पाहिजे. हरएक गोष्टीत दमन करता आले पाहिजे. अशा प्रकारच्या दैवी गुणांची वाढ झाली पाहिजे. या गोष्टी करण्याची संवय माणसाच्या अंगी जडली पाहिजे, व ती दैनंदिन जीवनातील हरएक लहान मोठ्या गोष्टीत दृग्गोचर झाली पाहिजे. या सर्व गोष्टी करायला लावील अशा आचारधर्माची आज जरूरी आहे.

श्रीसाईबाबांनी विश्वधर्माला पोषक, माणसात बंधुभाव जागृत करण्याचे कार्य जीवनभर केले. त्यांच्या कार्याकडे आपण या दृष्टीने पाहिले पाहिजे. केवळ पाहिले पाहिजे एवढेच नव्हे तर त्या मार्गाने आपली पावले अहर्निश पडून जातील यासाठी झटले पाहिजे. असा आशावाद श्रीसाईबाबांच्या ६३ व्या पुण्यतिथी निमित्ताने प्रसिद्ध होणाऱ्या श्रीसाईलीला श्रीसाईबाबा विशेषांकाच्या प्रकाशन समयी करतो.

## श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी
## ६३ वा पुण्यतिथी महोत्सव

# जाहिर आमंत्रण

श्री साईबाबा संस्थान शिरडीतर्फे श्री साईबाबांचा ६३ वा पुण्यतिथी महोत्सव येत्या विजयादशमीस बुधवार दिनांक ७ ऑक्टोबर ते शनिवार दिनांक १० ऑक्टोबर १९८१ पर्यंत शिरडीस साजरा होत आहे तरी श्रीसाई भक्तांनी हेच निमंत्रण समजून उत्सवास हजर राहून सर्वतोपरीने सहकार्य द्यावे अशी विनंती श्री. क. हि. काकरेसाहेब कोर्टरिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिरडी हे करतात.

या उत्सव प्रसंगी गायक कलाकार म्हणून श्री सवाई गंधर्व व रजनी जोशी यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

# आदिमातेच्या शक्तीची महाराष्ट्रातील साडे तीन प्रमुख प्राचीन शक्तिपीठे

भारतामध्ये अगदी प्राचीन काळापासून शक्तीची उपासना चालत आली आहे. परमेश्वराची क्रियाशक्ती आदिमातेच्या रूपाने विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय करते. या गृहीत तत्वावर ही उपासना आधारित असून देशाच्या कुठल्याही भागात कोणत्या ना कोणत्या स्वरुपात शक्तीची उपासना चालू असते. या शक्तीस आदिमाता, आदिमाया, जगदंबा, देवी अशी अनेक नावे आहेत.

महाराष्ट्रात या आदिमातेच्या शक्तीची प्रमुख व प्राचीन अशी साडेतीन पीठे आहेत. पहिले म्हणजे करवीर ( कोल्हापूर ) ची महालक्ष्मी, दुसरे तुळजापूरची महासरस्वती म्हणजेच तुळजाभवानी, तिसरे माहूरगड येथील महाकाली म्हणजेच रेणुकादेवी व अर्धपीठ म्हणजे वणी–सप्तशृंग देवी ( जगदंबा ).

## करवीरची श्री महालक्ष्मी

करवीर क्षेत्र व येथील श्री महालक्ष्मीचे ज्ञानपीठ अत्यंत प्राचीन आहे. ही महालक्ष्मी ( अंबाबाई ) सत्वगुण विशिष्ट आहे हे करवीर क्षेत्र आज कोल्हापूर नावाने प्रसिद्ध आहे. करवीर हे क्षेत्र १०८ कल्पांचे असून याला 'महामातृक' असे म्हणतात श्री विष्णू येथे महालक्ष्मी रूपाने राहिले आहेत असा पद्मपुराणात उल्लेख आहे.



येथील श्री महालक्ष्मी मूर्ती काळ्या रत्नशिळेपासून बनविण्यात आली असून अतिशय सुंदर आहे. ही मूर्ती एका दगडी चबुतऱ्यातून उभी असून तिची उंची तीन फूट आहे या चतुर्भुज मूर्तीच्या वरच्या उजव्या हातात गदा व डाव्या हातात ढाल खालच्या उजव्या हातात मातुलिंग व डाव्या हातात पानपात्र आहे. मस्तकावर शेषछायी मुकूट आहे. मूर्तीच्या भ्रूमध्यावर पद्मपुराण व मागे सिंह आहे. ही देवी कोल्हापूरच्या छत्रपतींची कुलस्वामीनी आहे.

देवालय हेमाडपंती असून बांधकाम अतिशय भव्य व सुंदर आहे. मंदिराच्या सर्व दगडावरील कोरीवकाम बघून डोळे दिपतात.

देवळाची रचना कमळाच्या आकाराची आहे. देवळात असंख्य खांब असून ते मोजू नयेत असा संकेत आहे. या पाषाण खांबावरील कोरीव काम अप्रतिम आहे. मंदिरात चार शिलालेख असून आतल्या बाजूस शोभेच्या मूर्ती आहेत.

दर शुक्रवारी तसेच आश्विन कार्तीक, मार्गशीर्ष व माघ पौर्णिमेस देवीची पालखी निघते. आश्विनातील नवरात्रोत्सव हा येथील सर्वात मोठा उत्सव.

## तुळजाभवानी

तुळजापूरची महासरस्वती म्हणजे तुळजाभवानी ही देवी रजोगुण विशिष्ट आहे. तुळजाभवानी ही महाराष्ट्राची माता असून शिवछत्रपती श्री. शिवाजी महाराजांची आराध्यदेवता आहे. कन्याकुमारीपासून गौरीशंकरापर्यंत अनेकांची ही कुलदेवता आहे. तुळजाभवानी म्हणजे महाराष्ट्राचे क्षात्रतेज, वीरांची क्षत्रियांची देवता.

तुळजापूर हे गाव उस्मानाबाद जिल्ह्यात असून सोलापूरपासून ९ मैल अंतरावर आहे. समुद्रसपाटीपासून हे गाव सुमारे २,६१० फूट उंच आहे.

गावाच्या पश्चिमेस एका कड्याच्या पोटात हे मंदिर आहे. अनेक पायऱ्या उतरून मंदिरात जावे लागते. मंदिराचा परिसर विस्तृत आहे. महाद्वारापासून मुख्य मंदिरापर्यंत जाण्यास तीन टप्पे लागतात. पहिले दोन टप्पे ओलांडल्यानंतर 'कल्लोळ व गायमुख' ही तीर्थे लागतात.

महाराष्ट्रातील सर्वसाधारण मंदिराप्रमाणेच हे मंदिर आहे. पण मंदिराला लागून असलेला राममंडप व त्यासमोरील शंकराचे मंदिर हे मांडपती आहे. मंदिराचे तीन दरवाजे चांदीचे व एक पितळेचा आहे. देवीचे सिंहासन चांदीचे आहे. मंदिराच्या प्रांगणात भक्तांनी नवस म्हणून ठोकलेल्या चांदीच्या रुपयांच्या खुणा आजही पहावयास मिळतात.

देवीची मूर्ती गंडकी शिळेची असून रेखीव व प्रमाणबद्ध आहे. देवी सिंहासिनी आहे. तिला शेंदूर चर्चित नाही. अष्टभुजा महिषासुर मर्दिनीचे ध्यान अत्यंत मनोहारी आहे. देवीची उंची २॥ फूट आहे. मूर्तीच्या उजव्या व डाव्या खांद्यावर अनुक्रमे सूर्य व चंद्राच्या आकृती आहेत. आठ हातापैकी सहा हातात वेगवेगळी आयुधे असून उर्वरित एका हातात महिषासुराची शेंडी व दुसऱ्या हाताने त्याच्या नरगडीत त्रिशूल खुपसला आहे. पायाखाली महिषासुराचे रेड्याच्या स्वरुपात शव आहे. भोगी व अलंकार पूजेच्या वेळी मूर्ती बघावयास मिळते.

### अवतार कथा

देवीच्या अवताराचे वर्णन स्कंदपुराणाच्या सह्याद्री खंडात दिले आहे. ते असे—

कृत युगात कर्दम नामक एक ऋषी होते. त्यांची पत्नी अनुभूती अतिशय सौंदर्यसंपन्न व पतिव्रता. दैववशात ऋषी मृत्यू पावले. महासती अनुभूतीने पतीसमवेत [illegible]

सहगमनाचा विचार केला परंतु पोटी लहान मूल असल्यामुळे हा विचार प्रत्यक्षात आणता आला नाही. तिने मंदाकिनी तिरी आश्रम बांधून उग्र तपश्चर्या सुरू केली ही समाधी स्थितीत असता तेथे कुंकर नामक दैत्य आला. अनुभूतीच्या सौंदर्याने तो बेभान झाला. त्याने महिषाचे रूप घेऊन अविचाराने अनुभूतीला स्पर्श केला. तिचा ध्यानभंग झाला. तिने डोळे उघडले व या महा आपत्तीतून सुटका करण्यासाठी देवाचा धावा सुरू केला. तिच्या हाकेला ओ देऊन अष्टभुजा महिषासूरमर्दिनी प्रगट झाली. महिषाच्या रूपातील कुंकराचा तिने वध केला व आपल्या भक्ताचे रक्षण केले. ही महिषासूर मर्दिनी म्हणजे तुळजाभवानी.

देवीची नित्य चार वेळा पूजा होते. प्रत्येक मंगळवारी व पौर्णिमेस आवारात छबिना काढण्यात येतो. आश्विनातील नवरात्र महोत्सव हा देवीचा मोठा उत्सव. आश्विन शुद्धप्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत हा उत्सव चालतो. विजयादशमीनंतर पौर्णिमेला सोलापुरहून काठ्या येत असतात. जाडजूड व प्रचंड उंच अशा या काठ्या हातात घेऊन भाविक लोक पायी प्रवास करीत येतात. रस्त्यात या भाविकांचे स्वागत होते. ही मिरवणूक वैशिष्ट्यपूर्ण व प्रेक्षणीय असते. श्रींच्या शिलंगणासाठी नगरहून पालखी व श्रमनिद्रेसाठी भिंगारहून दरवर्षी पलंग येत असतो. शिलंगणाचा सोहळा अवर्णनीय आहे.

अमरावती येथील अंबादेवी हे विदर्भातील जनतेचे प्रमुख दैवत ही अंबादेवी स्वयंभू असून भारतवर्षातील ती एक प्रमुख शक्तिपीठ मानली जाते. या संबंधीचा उल्लेख पुराणात आढळतो. रुक्मिणीला भगवान श्रीकृष्णाने तिच्या मर्जीनुसार एकवीरा देवीच्या देवळातून पळवून नेले असल्याची आख्यायिका आहे. एकविरा व अंबा या दोन देवी बहिणी आहेत असे मानतात. आश्विन महिन्यात देवीचा उत्सव फार मोठ्या प्रमाणात होतो. दूरदूरहून भाविक देवीच्या दर्शनासाठी येथे येत असतात. दोन्ही देवींची मंदिरे अतिशय भव्य असून प्रेक्षणीय आहेत.

## माहूरची रेणुका देवी

आदिशक्तीची तमोगुण विशिष्ट मूर्ती म्हणजे माहूरची रेणुका देवी. रेणुका देवी हे महाराष्ट्रातील जगदंबेच्या साडेतीन शक्तीपीठापैकी एक प्राचीन शक्तीपीठ आहे.

नांदेड जिल्ह्याच्या ईशान्य टोकावर सह्याद्रीच्या एका उंच पठारावर माहूर वसलेले आहे. माहूरच्या तिन्ही बाजूंनी पैनगंगा नदीने वेढा दिला आहे. सभोवताली घनदाट जंगल व झाडी यामुळे माहूरला निसर्गाचे वरदानच लाभले आहे. रेणुका देवीच्या वास्तव्यामुळे या गावास माहुर किंवा मातापूर अथवा मातृपूर असे नाव पडले.

रेणुकेचे मुख्य स्थान डोंगरावर आहे. देवळात देवीची मूर्ती वगैरे नसून तांदळा आहे. हा तांदळा म्हणजे दगडाचा अजस्र असा शिराचा भाग. हा तांदळा सुमारे ५ फूट उंच व बराच रूंद आहे. हा तांदळा शेंदूर चर्चित असून तोंड, नाक, डोळे, भव्य व विशाल कपाळ, नथ, मुकुट व वस्त्राभरणयुक्त असा आहे. पुराणातील कथा अशी :

माहूरगडावर परशुरामाने पितृ आज्ञा म्हणून आपल्या मातेला रेणुकेला ठार केले. जमदग्नीच्या वराने रेणुका पुन्हा जिवंत झाली. कालांतराने ती निधन पावली. परशुरामाला मातृवियोग सहन होईना व त्यामुळे तो मातेचे क्रिया–कर्म करण्यास प्रवृत्त होई ना यास्तव दत्तात्रेयाने त्याची समजूत घालून त्यास क्रिया–कर्म करण्यास प्रवृत्त केले. ही क्रिया यथाविधी पार पाडल्यास तुझी आई पुनश्च जिवंत होईल असे त्यास सांगितले. ते लक्षात असुनही उतावीळ होऊन परशुरामाने क्रिया चालू असतानाच मातेला हाक दिली तेव्हा रेणुकेने ‘काय बाळ’ म्हटले झाले पुढील क्रिया स्थगित झाली त्यामुळे तोंडाचा भाग तेवढा जिवंत राहिला. मानेखालच्या धडाचा भाग अचेतन राहिला म्हणून या ठिकाणी रेणुकेचे केवळ मुखच मूर्ती म्हणून राहिले, असे म्हणतात.

रेणुकादेवी शिवाय येथे परशुरामतीर्थ व दत्तमंदिरे ही दोनच प्रमुख मंदिरे आहेत.

## सप्तशृंगी

सप्तशृंगीचे शक्तिपीठ हे अर्ध पीठ मानण्यात येते. अत्यंत प्राचीन असे हे स्थान आहे.


नासिक जिल्ह्यामध्ये चांदिवड डोंगराच्या रांगेत सप्तशृंग पर्वत आहे या पर्वतास सात शिखरे आहेत म्हणून त्यास ‘सप्तशृंग’ म्हणतात. या सप्तशृंगाच्या पायथ्याशी वणी हे एक लहान गाव आहे. त्यावरून सप्तशृंग देवीला ‘वणीची देवी’ म्हणतात. देवीचे ठिकाण समुद्रसपाटीपासून सुमारे ४६,०० फूट उंचीवर आहे. देवीच्या देवळापर्यंत जाण्यासाठी ५०० पायऱ्या चढाव्या लागतात.

## देवीची मूर्ती

शिखराच्या मधोमध कपाऱ्यामध्ये देवी जगदंबेचे पवित्रस्थान आहे. देवीची मूर्ती भिंतीत कोरलेली असून तिला प्रदक्षिणा घालता येत नाही. ही मूर्ती अति भव्य व विशाल आहे. ही मूर्ती १२ फूट ऊंच असून तिला १८ हात आहेत. प्रत्येक हातात एकेक अस्त्र आहे. मूर्तीचे रूप उग्र व तेजस्वी असले तरी दर्शनीय आहे. ही वस्त्रालंकारानी आभुषित आहे. देवीची मूर्ती पूर्वाभिमुख आहे.

या देवीला प्रदक्षिणा घालणे शक्य नसले तरीही संपूर्ण मंदिराला प्रदक्षिणा घातल्याखेरीज यात्रेची पूर्तता होत नाही असे मानतात. प्रदक्षिणेचे दोन मार्ग आहेत. एक सहा मैल लांबीचा तर दुसरा २० मैल लांबीचा गड उतरून ही प्रदक्षिणा करावी लागते व भक्त ती मोठया उत्साहाने करतात.— साईनंद

☆



शिरडीतील श्रीखंडोबाचे मंदिर

भक्तांसाठी नवी माहितीपूर्ण लेखमाला... ६

# शिरडीतील श्रीखंडोबाचे मंदिर

—सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक, 'श्रीसाईलीला'
श्री साईबाबा संस्थान शिरडी

• सर्व लहान थोर, उच्च नीच मोठ्या आस्थेने भक्तीने ज्याची उपासना करतात ती देवता म्हणजे महाराष्ट्राची मराठमोळी देवता खंडोबा ही होय. महाराष्ट्रातील बहुजन समाज दोन देवताना विशेष मानतो. एक विठोबा व दुसरा खंडोबा. पंदरपूरच्या विठोबाचे नाव ऐकताच महाराष्ट्राच्या एका विभागात भक्ती रसाची असंख्य कारंजी थयथय नाचू लागतात तर खंडोबाचा उच्चार होताच मराठमोळ्या मर्द विभागाचे बाहू आपोआप स्फुरू लागतात. विठ्ठलाचे नामस्मरण महाराष्ट्राचे मन शुद्ध करते तर खंडोबाचे चिरस्मरण मराठ्यांचे चित्त घट्ट करते. मूळ शंकरापासून या खंडोबा देवतेची उत्पत्ती आहे. खंड, परशु, मल्हारी मार्तंड, स्कंदोबा, खंडेराव, म्हाळसाकांत, येळकोटी देव अशी विविध नावे या देवतेला दिलेली आहेत. हे शूरांचे वीरांचे कुलदैवत आहे.

शिरडी गावात या देवतेचे असलेले हे मंदिर खूप जुने आहे. ते किती जुने आहे याची नीटशी कल्पना येत नसली तरी ते निदान चार पाचशे वर्षापूर्वीचे नक्कीच असावे. शिरडीस एस. टी. तून उतरल्यावर श्री साईसमाधी मंदिराकडे जाण्यासाठी मुख्य सडकेवर आल्यावर अग दी समोरच श्रीसाईनाथ रुग्णालय दृष्टीस पडते, व या रुग्णालयाच्या अगदी शेजारीच हे एक घुमटी असलेले छोटेखानी मंदिर दिसून येते. जुन्या शिरडीतील हे प्रसिद्ध देऊळ म्हणुन प्रसिद्ध आहे.

संत चूडामणी भगवान श्रीसाईबाबांचे शिरडीस अगदी प्रथम आगमन इ. सन १८५२ मध्ये झाले असावे. त्यावेळी ते तिथे काही काळ म्हणजे जवळजवळ वर्षभर तरी वास्तव्यास होते. पण त्या काळात त्यांचेकडे फारसे कुणाचे लक्ष गेले नाही. पुढे ते शिरडी सोडून गेले व इ. सन १८५४ च्या सुमारास औरंगाबाद जिल्ह्यातील धूपखेडे गावच्या चांदभाई पाटलाच्या भाच्याच्या लग्नाच्या वऱ्हाडा बरोबर त्यांचे शिरडीस पुन्हा आगमन झाले. ही शादीकी बारात खंडोबाच्या देवळा जवळ गावाबाहेरील एका मळ्यात उतरली होती. त्यावेळी बाबा या खंडोबाच्या देवळात गेले. त्यावेळी या देवळाचे पुजारी श्री म्हाळसापती सोनार हे होते. म्हाळसापती सोनार हे देवश

ब्राम्हण हे त्या मंदिराचे पुजारी व मालक होते. खंडोबा हे त्यांचे कुलदैवत. अनेक पिढ्यापासून चालत आलेली खंडोबाची वारी त्यांचेकडे यावेळी आली होती आणि म्हणून शिरावर पडलेली जबाबदारी ते मनापासून व भक्ती भावाने पार पाडीत असत. त्यावेळी म्हाळसापतींना शिरडीतील मंडळी भगत या नावाने ओळखत, पुकारीत असत.

श्रीबाबा जेव्हा या खंडोबाच्या मंदिरात प्रथम गेले तेव्हा त्यांच्या अंगात कफनी कमरेला धोतर व डोक्यावर टोपी असा त्यांचा वेष होता. त्या तरूण सुंदर उंच देखण्या व्यक्तीकडे म्हाळसापतींचे लक्ष जाताच ते धावत त्या तरुण साधूकडे गेले आणि म्हणाले, " आवो मेरे प्यारे साई " एवढेच म्हणून न थांबता त्यांनी त्यांना प्रेमाने दृढ आलिंगन दिले. आपले डबडबलेले डोळे न पुसताच ते म्हणाले, साईजी, आता कृपा करून या लेकराला सोडून पुन्हा जाऊ नका. गेली ३ वर्षे मी आपणाला शोधत होतो. मला असे पोरके करून आपण कुठे गेला होतात! मी आपणाला यापुढे कुठेही जाऊ देणार नाही. तरुण साधूने आपल्या अमृतमय, स्नेहाळ दृष्टीने त्या गृहस्थांकडे पाहून आपला अभयहस्त त्यांचे मस्तकावर ठेवला त्या करस्पर्शाने त्या प्रथम वयीन गृहस्थांची, श्रेष्ठ भक्त म्हाळसापतींची काया पुलकित झाली. दोघांनाही एकमेकांच्या अंतःकरणाची ओळख पटली.

म्हाळसापतींच्या वयाच्या मानाने लहान असणारे त्यांचे सद्‌गुरु म्हणजे आपले सर्वांचे श्रीबाबा ते शिर्डीत २–३ दिवस राहिले व पुन्हा राहात्यास गेले, म्हाळसापती परत दुःखी कष्टी झाले. पण बाबा परत आले आणि म्हाळसापतींना फुलझाडांची रोपटी बाग करण्यासाठी दिली. म्हाळसापतींनी ती आनंदाने मान्य केली. सद्‌गुरुने आज्ञा करावी व आपण ती पाळावी. प्रत्यक्ष खंडोबाच आपल्या नशिबाने आपल्यात वावरत आहे. या दृष्टीने बाबांकडे पहावे. सदा निजानंदात असावे. वाटेत भेटेल त्याला बुक्का लावावा. जननिंदेकडे दुर्लक्ष करावे; कुटुंबवत्सल असूनही विरक्तीने रहावे असा म्हाळसापतींचा दिनक्रम होता. पडक्या मशिदीत बाबा एकटेच झोपतात या विचाराने त्यांच्या जिवाला हळ हळ वाटे. रात्ररात्र झोप नसे. त्यांच्या मनीची तळमळ बाबांनी जाणून त्यांना मशि दीत झोपावयाची परवानगी दिली. कुटुंबाचा रोष पत्करून मोठ्या आनंदित मनाने म्हाळसापती बाबांबरोबर मशिदीत झोपू लागले. एक हस्त बाबांच्या छातीवर ठेऊन अहोरात्र सद्‌गुरू सेवा हातून घडावी म्हणून जागू लागले. बाबा म्हणतील तो शब्द प्रमाण मानून आनंदाने राहू लागले. शिर्डीतील अन्य संत साधू जानकीदास, देवीदास, गंगागीर, आनंदनाथ यांची त्यांनी बाबांशी भेट घडवून आणली. या संत मंडळीत म्हाळसापती ब्रम्हानंदाचा उपभोग घेऊ लागले.

श्रीबाबांना ' श्रीसाईबाबा ' हे नाव याच खंडोबाच्या देवळात प्रथम पडले, व ते जे रूढ झाले आहे ते आता अगदी कायमचेच. यावेळी बाबांचे वय सुमारे १७-१८ वर्षांचे असावे. श्रीसाईबाबांच्या जीवनात या खंडोबाच्या मंदिराची अशी विशेष महती आहे.

श्रीखंडोबा मंदिर पूर्वाभिमुख असून जुन्या दगडी बांधणीचे आहे; व ते चौरस चौरस आकाराचे आहे. मंदिराचे गर्भागार १५" × १५" लांबी रुंदीचे असून अगदी मध्यभागी मार्तंड भैरवाची-खंडोबाची पाषाण मूर्ती आहे. या मूर्तीच्या डाव्या हाताला म्हाळसा व उजव्या हाताला बाणाई अशा मूर्ती आहेत. म्हाळसादेवी समोर वाघ व बाणाई समोर कुत्रा असे प्राणी आहेत. म्हाळसा व बाणाई या खंडोबाच्या दोन नायका होत. म्हाळसा वणिज कन्या व बाणाई ही धनगर कुळातली होय. असे सांगतात की ह्या पार्वती व गंगा यांची रूपे होत. श्री मार्तंड भैरवाच्या मूर्तीपुढे खालच्या पायरीवर जमिनीपासून वीतभर उंचीवर दोन शिवलिंगे आहेत. भक्तांना प्रदक्षिणेसाठी सभोवती भरपूर मोकळी जागा सोडण्यात आलेली आहे. देवळात जुनी चित्रे व देवादिकांच्या काही तसबिरी दिसून येतात. देवळाला लाकडी दरवाजा असून त्याला लोखंडी गज लावलेले आहेत. देऊळ बंद असले तरी गजातून श्रीखंडोबाचे दर्शन सहज घडते. हे दर्शन घेण्यासाठी दोन दगडी पायऱ्या चढून वर जावे लागते. याच खंडोबाचे देवळात श्री बाबांनी साकोरीचे श्री उपासनी बाबांना व नगरचे श्री संत मेहेरबाबांना तपश्चर्या करण्याचा आदेश दिला होता.

जेव्हा शिरडीला देशाचे महत्त्व येऊ लागले, जीर्ण मशीद उभे राहण्यासाठी अपुरी पडू लागली. लोकांनी तिचा जीर्णोद्धार करावयाचे ठरविले. परंतु बाबा परवानगी देतील का या आशंकेने कोणी पुढे यावयास तयार होईना. अशावेळी म्हाळसापतींनी मोठ्या मिनतवारीने ती मिळविली. मशीद दुरुस्त झाली. भक्तमंडळी बाबांची मशिदीतून चावडीपर्यंत मिरवणूक काढू लागली. यावेळी बाबांचा उजवा शुभहस्त हातात धरून देण्याचे भाग्य म्हाळसापतींना लाभले. इतकेच नव्हे, तर बाबांची पूजा करण्याचा मानही म्हाळसापतींनाच मिळाला.

म्हाळसापती परिस्थितीने गांजलेले. कशीबशी हातातोंडाशी गाठ पडे पण वृत्ती अगदी निःस्पृह. त्यांनी बाबांजवळ अवाक्षरानेही कधी उच्चार केला नाही की, पसा पसरला नाही. एका भक्ताने त्यांची ही परिस्थिती पाहून त्यांना काही रक्कम देण्याचे ठरविले तेव्हा बाबा पटकन म्हणाले, " माझ्या म्हाळसापतीला या ऐहिक वैभवाची मुळीच गरज नाही. त्याला हवे आहे ते वैभव कधीच मिळाले आहे. तो आपल्या

स्थितीत आनंदात आहे. खोट्या वैभवाला भुलणारा माझा म्हाळसापती नव्हे बरे!"
एका श्रेष्ठ, विरागी, त्यागी, तपस्वी, निःस्पृह, परमभक्त, परमप्रिय अशा म्हाळसापतीविषयी बाबांचे हे किती विश्वासाचे बोल! त्या विश्वासावरच बाबांनी एक विलक्षण गोष्ट घडवून आणली. दम्याच्या व्याधीने सहनशीलता संपुष्टात आली असे वाटल्यावरून बाबांनी आपला आत्मा ब्रम्हांडी नेऊन ठेवण्याचा ३ दिवसांचा संकल्प केला. अशावेळी ते म्हाळसापतींना म्हणाले, "प्रिय भक्ता, मी ३ दिवस माझा आत्मा ब्रम्हांडी नेऊन ठेवत आहे. दक्षिण बाजूच्या उजव्या कोपऱ्यात समाधी म्हणून बाहेर दोन लाल निशाणे लावून माझा देह तेथे ठेऊन रक्षण करा. मला उठविण्याचे मनातही आणू नका. लाल निशाणे लावा त्यामुळे कोणीही तिकडे फिरकणार नाही. कबूल आहे ना?" "होय देवा" असे म्हाळसापतींनी कबुली दिली. त्याक्षणी बाबांचा देह अचेतन होऊन म्हाळसापतींच्या मांडीवर पडला. त्यांनीही तो ३ दिवस प्राणपणाने रक्षण केला. बाबांची अवस्था लोकांनी पहाताच अंत्यसंस्कार करण्यासाठी हिंदू-मुस्लीम दोन्ही जमातीचे लोक जमले. अशा वेळी म्हाळसापतींनी त्यांना विनवून ७२ तास वाट पहा असे सांगितले. म्हाळसापतींचे वैराग्य, त्यांची दृढ निष्ठा आणि त्यांचा निश्चय पाहून लोकांनी त्याला मान्यता दिली. अखेर ७२ तासानंतर बाबा पुन्हा भानावर आले. म्हाळसापतींना आनंदी आनंद झाला. मूठभर लोकांच्या आग्रहाला बळी पडून आपण त्यांचे ऐकले असते तर जन्मोजन्मी गुरुहत्येचे पातक डोक्यावर बसले असते. परंतु बाबांनीच त्यातून सोडविले. आपल्या श्रेष्ठ भक्ताची बाबांनी अशाप्रकारे परीक्षाच घेऊन आपल्या भक्तमालिकेत त्यांना उच्चस्थानी नेऊन बसविले.

दिवसेंदिवस बाबांची कीर्ती दशदिशात दुमदुमू लागली. लोक दुरदुरून येऊ लागले. त्यांची सेवा म्हणजे बाबांची सेवा या भावनेने त्यांच्या सरबराईत म्हाळसापती वागू लागले. सदा चेहऱ्यावर हास्य, आदरभाव, त्यामुळे पहाणाराचे मनही प्रसन्न होई. म्हाळसापती अनेक भक्तांचे अनुभव सांगत. स्वतःचे सांगत. मक्केमदिनेची यात्रा करून आलेल्या हाजला, खाशाबा देशमुखाची वृद्ध आई जी गुरुमंत्रासाठी ३ दिवस उपोषण करून राहिली होती, तिला बाबांनी थोडक्यात केलेला बोध ('श्रद्धा व सबुरी' हे दोन पैसे देवाला दिले की सर्व त्यात आले') हा पटविला म्हाळसापतींनीच तिची गोष्ट सांगून!

बाबा दसऱ्याच्या शुभ मुहुर्तावर निजधामास गेले त्यावेळी सर्व भक्तगण दुःखसागरात बुडाला. म्हाळसापतींनाही शोक अनावर झाला. मागीलप्रमाणे योगसामर्थ्याने बाबांनी ७२ तास समाधी घेतली तशीच यावेळी घेतली असेल असे त्यांच्या भोळ्या भावुक मनाला वाटत होते परंतु ती आशा फोल ठरली. म्हाळसापती

मूक अश्रु ढाळीत होते. आपले सुखनिधान यापुढे आपणास प्रत्यक्ष दिसणार नाही परंतु बाबा आपल्यापासून दूर नाहीत, याची त्यांच्या सतत सहवासात राहिल्याने त्यांची खात्री होती. बाबा देहाने गेले तरी त्यांच्या हातांच्या वस्तूंच्या रूपाने ते अमर आहेत. त्यांचा नित्य वास या शिर्डीत आहे असे त्यांचेच मन त्यांची समजूत करीत होते. हृदयस्थ परमात्मा त्यांना ही जाणीव वेळोवेळी देत होता. मनातल्या मनात बाबांचे बोलणे, निर्मळ प्रसन्न हसणे, त्यांचे लेंडीवर जाणे येणे, चावडी मिरवणुकीचा सोहळा, रोजचा इंडीचा सोहळा, दिवसभराच्या आरत्या, भक्तावरील बाबांचे अनुपम प्रेम, रोगग्रस्त, आपद्ग्रस्त यांना दिलेला दिलासा, अखंड पेटत राहणारी धुनीमाई, बाबांचे परमकोमल चरणयुगुल, त्यांचे प्राणीमात्रावरील प्रेम या सर्व गोष्टी त्यांना पुन्हा पुन्हा आठवत होत्या. डोळे अश्रूंनी डबडबले होते पण त्यांनी मन आवरले. सिद्धकोटीला पोचलेल्या त्या भक्ताला रडणे, उसासे शोभले नसते.

श्रीबाबा गेले परंतु त्यांनी आपल्या या लाडक्या भक्ताला आपला आवडता सटका, कफनी चांदीचे रुपये या वस्तू कायम बाळगण्यास दिल्या. याचाच अर्थ या रूपाने मी तुमच्या जवळ आहे आणि तुम्हाला पिढ्यानपिढ्या काही कमी पडणार नाही. वयाने मोठे असलेल्या म्हाळसापतीवर बाबांनी मातेसारखे प्रेम केले. अंतरीचे गुह्य त्यांनाच सांगितले. आपला अखंड सहवास त्यांना दिला. आपल्या वस्तु त्यांचे जवळ नित्य ठेवण्यासाठी दिल्या याहून आणखी भाग्य ते कोणते ? आणि बाबांचा देह जतन करून म्हाळसापतींनी आपणाला साईसारखे रत्न दिले याहून आपले तरी आणखी भाग्य कोणते ?

धन्य ते म्हाळसापतीसारखे भक्त आणि धन्य त्यांना ओळखणारा दत्तअवतारी साई !

म्हाळसापतींच्या देहावसनानंतर त्यांचे पुत्र श्री मार्तंड महाराज हे सध्या खंडोबाच्या मंदिराची देखभाल करतात. त्यांचे वय सध्या ९० च्या आसपास आहे. बाबांचा सहवास त्यांना घडलेला आहे. खंडोबाची पूजा प्रार्थना ते दररोज सकाळी करतात; व पूजा विधी केल्यावर देवळाचे दरवाजे बंद करून ते आपल्या घरी जातात. घरी त्यांच्या देवघरातील पूजा अर्चा नंतर सुरु होते.

श्रीसाईबाबा संस्थानच्या अधिकार क्षेत्रात हे खंडोबाचे मंदिर येत नाही. स्वतंत्र पणे श्री मार्तंड महाराज या देवळाचा साराच कारभार स्वतः पहातात. श्रीबाबांच्या जीवनात नामक्रांती करणारे हे स्थान, मंदिर असल्याने त्या मंदिराची ही ओळख भक्तांना करून देणे यथा योग्य होय म्हणून देत आहोत.

दरवर्षी चंपाषष्ठीला येथे एक सुंदर प्रेक्षणीय कार्यक्रम होत असतो. देवळासमोर एक चर खणला जातो व त्यावर फुलते निखारे पसरले जातात. खंडोबाचा भंडारा त्यावर उधळला जातो व त्या धगधगत्या निखाऱ्यावरून पायात काही एक न घालता चालत जाण्याचा यशस्वी कार्यक्रम होत असतो. यामुळे पायाला फोड येत नाहीत किंवा कोणत्याच प्रकारची इजा पोचत नाही.

★

दसऱ्याच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध होत आहे.

श्रीसाई साहित्याला वाहिलेला मराठीतील

पहिलाच दिवाळी अंक

## श्रीसाई कृपा–१९८१

किंमत फक्त सहा रुपये

श्रीसाईंना आपल्या चर्म चक्षूंनी प्रत्यक्ष पाहिलेल्या, बाबांच्या पुण्यस्पर्शाने पावन झालेल्या पुण्यवंत, वृद्ध, अनुभवी व्यक्तींच्या शब्दातून साकारलेली कसदार नाविन्यपूर्ण लेख माला.

## " असे होते साईबाबा "

पुजेसाठी घरोघरी ठेवण्याजोगे मोहक सर्वांग सुंदर श्रीसाईंच्या छबीचे मुखपृष्ठ आणखी अनेक दुर्मिळ फोटो. खालील पत्त्यावर संपर्क साधा आणि आपल्या प्रती आजच नोंदवा.

— साईकवी श्री. प्रभाकर कोळमकर / विजय हजारे

मा. संपादक " श्रीसाई कृपा "

द्वारा कृपांशू प्रकाशन

सी/६, गुंफादर्शन फर्स्ट कार्टर रोड, बोरीवली–पूर्व मुंबई–४०० ०६६

# ॥ कुठेही जा दुनियेवर। मी तो तुम्हाबरोबर ॥

—कु. अमोल मनोहर पितळे
पितळे वाडी हनुमान रोड,
विलेपार्ले ( पूर्व ) मुं. ५७

( बाबांची पंचधातूची मूर्ती करणारे विलेपारल्याचे कारागिर श्री. मनोहरपंत पितळे यांचा हा मुलगा मोठा साईभक्त आहे. शाळेत जाताना रस्त्यात जर कुठे बाबांचे चित्र दिसले नाही की हा अक्षरशः कासावीस होतो नि दिसले की मग स्वारी खूष )

मी दर रविवारी व सुट्टीत साईसच्चरीतातील अध्याय १५ वा वाचतो. व आता तर तो माझा पाठ झाला आहे. मी अगदी डोळेमिटून बाबांसमोर उदबत्ती लावून तो वाचतो, व म्हणूनच वरील ओळींचा अनुभव मला आला. गेल्यावर्षीच्या बाल विशेष अंकात माझा लेख आपण सर्वांनी वाचला असेलच त्याहून अत्यंत चित्त थरारक व रोमहर्षक असा हा अनुभव आहे.

२५ मार्च १९८१ रोजी सकाळी साडेसात वाजता माझी इयत्ता दुसरीची वार्षिक परिक्षा होती. मी सकाळी लवकर उठून आमच्या घरातील श्रीसाईबाबांच्या मूर्तिला नमस्कार करून उदी घेऊन शाळेत जाण्यास निघालो. इतक्यात माझा मामा रीक्षा घेऊन मला शाळेत सोडण्यास आला. माझी आई पण माझ्याबरोबर आली. परंतु मी थोडा नाराज झालो होतो कारण इतक्या सकाळी मला साईबाबांचा फोटो रस्त्यात दिसेल कसा ! एरव्ही रोज शाळेत जाताना मला काही दुकानातील व काही टॅक्सी रिक्षा वरील बाबांचे फोटो हमखास दिसतात. आज सकाळी एकतर सर्व दुकाने उघडली नव्हती व मी मामाच्या रीक्षातून जाणार असल्याने रस्त्यावरून जाणाऱ्या टॅक्सी रीक्षातले फोटो मला दिसणे अशक्य होते. त्यामुळे मामाची रिक्षा शाळेत न्यावयास आल्याचा आनंद मला मुळीच झाला नाही. परंतु मी मनात बाबांचे नाव घेत शांतपणे रीक्षात बसलो. बाजुला माझी आई बसली. तिला पण बाबांचा फोटो कसा दिसणार ! याची चिंता होती. मी व आई रीक्षातून दोहो बाजुस पहात होतो पण काय उपयोग रीक्षा भरवेगाने शाळेच्या दाराशी केव्हा उभी राहिली ते समजलेच नाही.

# बाबा अशीच कृपा ठेवा

—कुमार राहुल खानविलकर
सीताकुंज, बॉंबे पुनारोड लोनावळा,

( लोनावळयाच्या साईभक्त व साईलीलेच्या एक मान्यवर लेखिका व कवयित्री डॉ. सौ. सुमती खानविलकर यांचा हा नातू राहुल. बाबांचा छोटा भक्त, अलीकडे बाबांवर लिहू पण लागलेला आहे. )

● कवीसंमेलन म्हणजे आमच्या आजीची नुसती धांदल चाललेली असते जणू काय पर्वणीच. घरात नुसते आनंदाचे वातावरण पसरलेले असते. पाच-सहा दिवसावर संमेलन होते आणि रात्री ११ वाजले. मी आईला मदत करत होतो. आमच्या पणजी आजीची आई या पण तिथेच होत्या. त्या म्हणाल्या, ' आता झोपा काय करायचे ते सकाळी करा. ' आजीने आटोपते घेतले. बाहेरच्या दाराला कडी लावायची म्हणून आजी ऊठली व तिने खालची कडी लावली व वरची कडी लावण्यासाठी हात वर केला, पाय उंचावले कारण उंची पुरत नाहीना. डाव्या हाताने दार दाबले व उजवा हात वरच्या कडीला लावले तोच डाव्या बाजूला आड- सर होते त्याला वेटोळे घालून एक फुरसे साधारण असे १०–१२ इंच लांबीचे बसले होते. कसे काय आले ते कळले नाही पण जेथे डावाहात आजीने ठेवला होता त्याच्यापासून दोन बोटे म्हणजे इंच दिढ इंच लांबीवर तो साप होता. आजीचे लक्ष त्याच्या त्या हिऱ्यासारख्या चकाकणाऱ्या डोळयावर गेले, ती तशीच मागे सरली : आमचे गडी झोपले होते त्यांना उठवून आणले. मग त्यांनी ते मारले गडी गावचे होते म्हणून पटकन म्हणाले, ' आंटी तुम्ही वाचलात. तुमच्यावर बाबांची कृपाच म्हणायची ही. '

आमची आजी आज आम्हाला बाबांनीच परत दिली, व कवी-लेखक समा- रंभात भाग घेता आला. बाबांचे दर्शन घडले. मी अभिषेक केला व पूजा केली. त्यावेळी मनापासून बाबांना म्हणालो अशीच कृपेची सावली आमच्यावर ठेवा.

झडप घालत होता काळ पण बाबाच झाले त्याचे काळ असे सतत लक्ष असते बाबांचे आपल्या भक्तांवर. बाबा परत परत तुम्हाला नमस्कार करतो व सांगतो– सद्‌बुद्धी व तुमची कृपा मला द्या.

आजी नेहमी म्हणत असते बाबांचे सर्वत्र लक्ष असते हे आज मला पटले.

बाबांचे होते लक्ष
काळाला मिळाले नाही भक्ष

३।४।२१

लगबगीने मी परिक्षेसाठी माझा ज्या वर्गात नंबर आला होता त्या वर्गात आईबरोबर गेलो. हा वर्ग अर्थात् मला नविनच होता. माझा नंबर आईनी शोधून काढला. मी माझ्या बाकावर बसलो. बाबांचा फोटो दिसून आशीर्वाद मिळण्याची आशा आता पार मावळली होती. मी माझ्या मनाची कशीबशी समजुत करून घेतली व घंटा होण्याची वाट पहात राहिलो. आई पण मला शाळेत सोडून घरी जाण्यासाठी निघाली. जाता जाता चारहि भिंतीवर ती आपली नजर फिरवीत होती काही देवांची व काही सुंदर सुंदर दृश्ये असलेली कॅलेंडरे भिंतीवर झळकत होती.

इतक्यात एक चमत्कार घडला. खरोखरच चमत्कार! अद्‌भुत चमत्कार! भिंतीवर एक उलटे झालेले कॅलेंडर होते. माझ्या आईने सहज कुतुहलाने ते सरळ केले व पहाते तर काय " मोठा बाबांचा आशिर्वादाचा फोटो " आईला दिसला. आईने मला मोठयाने हाक मारली. मी धावत आईजवळ गेलो, व माझ्या भेटीस अवचित धावून आलेल्या माऊलीला मनःपूर्वक नमस्कार केला. क्षणातच घंटा झाली व माझी परिक्षा सुरू झाली. मी मोठया खुषीतच पेपर सोडविला. पेपर सोपा होता हे सांगावयास नकोच. परंतु तीन दिवस बाबांनी मला आपल्या नजरेसमोर ठेवून सर्व पेपर लिहून घेतले व त्याचे उत्तम फळ मला मिळाले. श्रीसाईबाबांच्या कृपेने मी सर्व तुकड्यातून ह्या वेळीही सर्वप्रथम क्रमांक मिळवून पास झालो. म्हणूनच पंधराव्या अध्यायातील बाबांचे बोल मला सतत आठवतात. कुठेही जा दुनियेवर। मी तो तुम्हा बरोबर ॥

म्हणूनच माझ्या साईभक्त बालमित्रांनो आपण बाबांवर पूर्ण श्रद्धा ठेवा. तुम्हालाही अशीच गोड गोड फळे बाबा देतील.

जय साई

★


## ✻ श्री साईलीला ✻

### पुढील अंक नोव्हेंबर-डिसेंबर जोड अंक

**खास भक्त अनुभव विशेषांक म्हणून
ऐन दिवाळीत साईभक्तांच्या
हाती पडेल.**

# शिर्डीचा रमणीय परिसर

—कु. सुहासिनी मधुसूदन कोल्हटकर
द्वारा सौ. शुभांगी मधुसूदन कोल्हटकर
श्री साईनाथ हॉस्पिटल मु. पो. शिर्डी
जि. अहमदनगर

● शिर्डी हे नगर जिल्ह्यातील एक तीर्थक्षेत्र हे खूप गजबजलेले आहे. येथे रहदारी इतकी वाढली आहे कि रस्ता ओलांडताना किती तरी वेळ थांबावे लागते. भिकारी व या गावातील सर्व नागरिकांची चंगळ होत आहे. लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे. येथील पुष्कळशा लोकांनी दुकाने थाटून गाव गजबजून टाकले आहे. श्री साईबाबांनी थोर कार्य केले आहे. त्यांच्या शिर्डी संस्थानात आज ४०० ते ५०० लोक काम करूत पोट भरतात. या लोकांचा सरकारवर भारच होता. पण श्रीसाईबाबांमुळे ती अडचण दूर झाली.

या गावातील समाधी मंदिरातील श्रीसाईबाबांची मूर्ती संगमरवरी आहे. त्या मूर्तीचे तेज पाहून डोळे दिपून जातात. येथे श्रीसाईबाबांनी आपला देह ठेवला. येथील शोकेसमध्ये श्रीसाईबाबांनी हाताळलेल्या वस्तू आहेत. येथे श्रीसाईबाबांच्या स्मृती आहेत. प्रातःकाळी येथे श्रीसाईबाबांना दूध, दही, अत्तर इत्यादींनी स्नान घातले जाते. नंतर आरती होते. लोणी-साखरेचा प्रसाद दिला जातो. नंतर अभिषेक व श्री सत्यनारायणाची पूजा केली जाते. येथे 'गुरुस्थान' हे श्रीसाईबाबांच्या गुरूचे स्थान आहे. या मंदिरात एक लिंबाचे झाड असून ते झाड म्हणजे श्रीसाईबाबांचा साक्षात्कार आहे. या गावातील द्वारकामाई या मंदिरात श्रीसाईबाबांनी निर्माण केलेली धुनी सतत तेथे जळत असते. या मंदिरात श्रीसाईबाबांचे जाते, स्वयंपाकाची जागा, टेकायचा खांब चूल व झोपायची जागा आहे. या गावात श्रीसाईबाबांची 'लेंडीबाग' आहे. या उद्यानात ससे, हरणे व मोर हे पाळण्याजोगे प्राणी आहेत. येथे श्री दत्ताचे संगमरवरी मंदिरही आहे. या मंदिरासमोर नंदादीप सतत तेवत असतो या बागेतील फुलझाडे व फळझाडे सुंदर आहेत. ती श्रीसाईबाबांनी स्वतः वाढवलेली आहेत. या बागेतील 'श्रीसाईनिवास' ही दुमजली इमारत आहे. यातील खोल्या प्रशस्त आहेत.

श्री साई संस्थानने शांतिनिवास, साईनिवास, भक्तनिवास, साईनगर, समर्पण या इमारती बांधल्या आहेत. या गावातील श्री साईनाथ वाचनालयात श्री साई संस्थानने प्रकाशित केलेली पुस्तके मिळतात. तसेच कर्मचाऱ्यांची करमणूक म्हणून इतरही पुस्तके वाचण्यासाठी मिळतात. या गावात श्री खंडोबाचे मंदिरही आहे. या

मंदिरात श्री साईबाबा प्रथम आले. तेव्हा म्हाळसापतींनी श्री साईबाबांना “ याओ साई ” अशी हाक मारली. त्यावरूनच त्यांचे नाव श्री साईबाबा झाले. या मंदिराजवळच मोठा धर्मार्थ दवाखाना आहे. या दवाखान्यात गरिबांना मोफत औषधपाणी दिले जाते. त्यामुळे सर्वांची सोय होते. भोजनासाठी एक भोजनगृहही आहे. गरिबांची तर येथे मोफत सोय होते. हे भोजनगृह भव्य आहे.

घोडखिंड जशी बाजीप्रभू देशपांडे यांच्या पराक्रमाने पावनखिंड झाली तशी शिर्डी श्री साईबाबांच्या थोर कार्यामुळे पावन झाली आहे.

॥ अनंतकोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज योगिराज परब्रह्म ॥

॥ श्री साईनाथ महाराज की जय ॥

॥ श्री दत्तमहाराज प्रसन्न ॥

जाणा येथे आहे सहाय्य सर्वांस ।
मागे जे जे त्यांस ते ते लाभे ॥

— श्रीसाईबाबा

मे. शंकर हरी वैद्य

फोन: ४६७०१८

आणि कुष्टे ज्युवेलर्स (रत्नागिरीकर)

पाठारे मॅन्शन, ले.ज.रोड माहिम, मुंबई-१६. (कॅमल इंकशेजारी)

# बाबांनी टी. व्ही. सेंटर दाखविले

—कुमार विकास मधुकर वखारे
१२/२१२ बी. पी. टी. क्वार्टर्स वडाळा

( वडाळयाच्या ज्ञानेश्वर विद्यालयातील एक हुषार आणि साईभक्त विद्यार्थी, साईलीलेचे लेखक श्री. मधुकर वखारे यांचा हा मुलगा १४ वर्षांचा असून तो ९ वीत आहे. )

● श्री साईबाबांवर माझी नितांत श्रद्धा आहे. गेल्या वर्षी बालसाहित्य विशेषांकामध्ये मी बाबांविषयी लेख लिहिला त्याचे कौतुक सगळयानी केले. आमच्या शाळेच्या ( ज्ञानेश्वर विद्यालय ) मुख्याध्यापिका बाईंनी मला शाबासकी दिली. सगळया शिक्षकांनी स्तुती केली. माझा लेख शाळेतील फलकावर लावला, गेला व मी एक हुषार विद्यार्थी म्हणून शाळेत प्रसिद्ध पावलो. ही सगळी त्या अनंतकोटी ब्रह्मांड नायक योगिराज श्री साईबाबांची कृपा. बाबांनी मला जो प्रसाद ( आशिर्वादरूपी ) दिला तो वाटून खावा, इतर अनेक भक्ताना तो द्यावा म्हणून बाबांनीच हा लेख लिहिण्याची प्रेरणा दिली. दररोज मी श्री बाबांचे नामस्मरण करीत असतो ते एक चांगले टॉनिक आहे असे मी म्हणेन. बाबांचे नामस्मरण करून त्यांची मूर्ती डोळयासमोर आणून त्यांना मनोमन प्रार्थना करतो की या विश्वाचे कल्याण कर व झोपी जातो हा माझा नित्यक्रम आहे. त्यात खंड पडत नाही. जो जो मज भजे जैशा जैशा भावे। तैसा तैसा पावे मीही त्यासी। हे बाबांचे वचन सत्य आहे. म्हणूनच बाबा माझ्या पाठीशी उभे आहेत. याची मला पूर्ण खात्री आहे. माझी हुषार विद्यार्थ्यात गणना झाल्यामुळे ओघानेच मला अभ्यास करण्याची सुबुद्धीही बाबांनीच दिली. अभ्यासातही बाबांच्या कृपेने मी प्राविण्य मिळवितो आहे. टिळक विद्यालयातील इंग्रजीच्या परिक्षेत मी ८७ टक्के मार्क मिळवून शाळेत पहिला आलो. बाबा खरोखरच माझ्या पाठीशी उभे आहेत व ते मला कशी मदत करताहेत याची ज्वलंत प्रचिती नुकतीच मला अनुभवायला मिळाली.

आमच्या ज्ञानेश्वर विद्यालयातून टी. व्ही. वर लहान मुलांच्या किलबिल या कार्यक्रमासाठी दोन मुले व दोन मुली पाठवायच्या होत्या. ज्ञानेश्वर विद्यालयात हजारावर विद्यार्थी आहेत. त्यातून दोन मुले व दोन मुली निवडायच्या म्हणजे शिक्षकांची परीक्षाच होती. मला मनातून खूप वाटायचं की मला टी. व्ही. सेंटर नुसतं बघायला मिळालं तरी आनंद होईल, आणि बाबांनी माझ्या मनातली इच्छा पूर्ण केली. मुख्याध्यापिका बाईंनी मला बोलावून सांगितले

की तुला ' किलबिल ' कार्यक्रमात आम्ही पाठवणार आहोत तू-तयारी कर म्हणून माझा आनंद गगनात मावेना माझ्या वडीलांनी आधीच मला सांगितले होते की मनापासून बाबांची भक्ती केली. नामस्मरण केले की मनातल्या इच्छा बाबा पूर्ण करतात. किलबिलमध्ये आम्हा हुषार विद्यार्थ्यांना सर्वांना तयारी करायला सांगितली खरी परंतु माझी निवड होईलच हे निश्चित नव्हते. किलबील कार्यक्रम व्हावयाच्या आधी आठ दिवसांपासुन बाबांना मी विनवणी करीत होतो की बाबा मला टी. व्ही. वर पाठवा व माझी इच्छा पूर्ण करा अंतःकरण पुर्वक नामस्मरण त्यावेळी मी केले त्याचे चांगले फळ मला मिळाले. बाबांनी मला निराश केले नाही. टी. व्ही. वर पाठवायच्या दोन विद्यार्थ्यांत माझे नाव होते. मी किलबिल कार्यक्रमात टी. व्ही. वर गेलो. दुसऱ्या शाळेची व आमच्या शाळेची भूगोलाच्या ज्ञानाची स्पर्धा होती. आमची शाळा त्यात जास्त गुण मिळवून विजयी झाली. आमच्या शाळेला आम्हीं बक्षिस मिळवून दिले. नंतर शाळेनेही आम्हाला समारंभात बक्षिसे दिली. त्यात कुणी अज्ञात हितचिंतकाने मला पैशांच्या रुपात बक्षिस दिले. ते अज्ञात बाबाच तर नसतील ना ? मी टी. व्ही. सेंटर बघीतले. तेथील मेकअपमनने आमचा मेकअप केला व झगझगीत कॅमेरा समोर आमचा कार्यक्रम अर्धा तास चालला होता बाबांनी माझी इच्छा पूर्ण केली. तो आनंद शब्दात सांगणे कठीण आहे. माझ्या आयुष्यातील तो सगळयात आनंदाचा क्षण माझा जो जाहला काया वाचा मनी। तयाचा मी ऋणी सर्व काळ। हे बाबांचे वचन प्रत्येकाने हृदयात कोरून ठेवण्या सारखे आहे. बाबांवर जसा भाव असेल तसे फळ हमखास मिळते. हा माझ्या बाल आयुष्यातील अनुभव आहे. कर्ताकरविता श्रीसाईपरमेश्वरच आहे. माझ्या हातून नित्य श्रीबाबांची सेवा घडो व बाबा मला सतत शुभाशीर्वाद देत राहोत अशी मी बाबांच्या चरणी नम्र प्रार्थना करून समर्थ रामदासांच्या भाषेत म्हणेन की.

सदा सर्वदा दर्शन तुमचे घडावे
तुम्हा कारणे समर्पण माझे व्हावे
उपेक्षु नका मजला तुम्ही अनंता
श्रीसाईनाथा मागणे हेचि आता

# उदी हेच औषध!

—कु. प्रशांत हसमुख पाटील
गुजरगल्ली, मु. पो. ता. नवापूर,
जि. धुळे, पिन-४२५४१८

● दि. १ मे ला आमच्या शाळेचा निकाल लागला. मी इ. ६ वी पास होऊन इ. ७ वीत गेलो. २ मेपासून सुटी लागताच मी मोठ्या आनंदाने माझी वडील बहीण वर्षा व लहान बहीण जागृती यांच्या बरोबर मामाच्या गावी गेलो.

मामाच्या गावी तीन चार दिवस राहिल्यानंतर मला एके दिवशी रात्री १२ वाजता एकाएकी खूप ताप भरला व डोके अतिशय दुखू लागले. मामाच्या घरी ताप व डोकेदुखीवर कोणत्याही प्रकारचे औषध किंवा गोळ्या नव्हत्या. ताप रात्री हळूहळू वाढतच होता. मला ताप व डोकेदुखी जेव्हा अगदीच असह्य झाली तेव्हा मला अचानक माझ्या वडिलांनी माझ्या बरोबर दिलेल्या श्री साईबाबांच्या उदीची आठवण झाली. लगेच मी श्री साईबाबांचे नाव घेऊन त्यांची चिमूटभर उदी तोंडात टाकली आणि चिमूटभर उदी कपाळावर लावली. तसेच थोडीशी सर्वांगाला चोळून घेतली, आणि श्री साईबाबांचे नाव घेत घेत झोपण्याचा प्रयत्न करू लागलो तो काय आश्चर्य ! पाच दहा मिनिटांनीच माझा ताप हळूहळू उतरू लागला व डोकेदुखी तर अजिबात बंदच होऊन गेली. अवघ्या अर्ध्या तासातच माझा सगळा ताप उतरून मी बाबांचे नाव घेत घेत गाढ झोपी गेलो. अशी ही सर्व माझ्या बाबांची लीला आहे. बाबा म्हणजे फार मोठे डॉक्टर आहेत. रोगावर बाबांचे नाव व उदी हेच मोठे औषध आहे.

★

# भक्ती!

–कु. सुषमा सूर्यकांत गर्जे
पुणे

[ पुण्याचे साईभक्त दांपत्य श्री. व सौ. गर्जे यांची ही कन्या. आपल्या आई वडीलांप्रमाणेच ही पण बाबांची भक्त आहे. ]

वाचक हो ! आपण सर्व साईभक्त असल्यामुळे आपणास ' भक्ती ' या शब्दाचा अर्थ अगदी तंतोतंत माहीत आहे. या शब्दाचा गूढार्थ जर आपल्या सर्वांना विचारला-तर आपण सर्व त्याचा अर्थ आपआपल्या भाषेत, आपआपल्या शब्दात थोडा थोडा फरक असलेला सांगाल. आज साईबाबांच्या कृपेने बाबांच्या मासिकात माझ्या मोडक्या तोडक्या भाषेत भक्ती या विषयावर मी माझे लहान सहान विचार प्रकट करीत आहे.

भक्ती हा शब्द अत्यंत शक्तिमान आहे. भक्ती म्हणजे एखाद्यावर अत्यंत श्रद्धा व विश्वास असणे त्याला आपले सर्वस्व मानणे. वेळ पडलीच तर त्याच्या-साठी जीवदान करणे.

आपण भक्ती कोणाची करतो ? आपण भक्ती आपल्या माता-पिता, गुरू व ईश्वराची करतो. आपण तन, मन आणि धन अर्पण करून जर भक्ती केली तर अर्थात अगदी हृदयापासून व श्रद्धेने केली तर ती नक्कीच सफल होते. हे त्रिकालाबाधित सत्य होय. भक्ती करण्यासाठी आपल्याला कुठलीही अट पाळावी लागत नाही. भक्ती कोणीही करू शकतो स्त्री असो वा पुरुष, म्हातारा असो वा बालक, गरीब असो वा अमीर सुशिक्षित असो वा अशिक्षित.

माझ्या या छोट्याशा गोष्टीवरून आपल्याला कळेल की भक्ती कशी असावी एकेकाळी हरीजन लोकांना देवळात जाण्यास मनाई होती. अशाकाळी एका छोट्याशा गावात एक रामाचे मंदीर होते. एक ब्राह्मण त्या मंदीरात रामायणाचे पारायण करीत असे त्याच गावात एक हरीजन रहात असे. तो रामाचा भक्त होता. तो संध्याकाळी नियमीतपणे देवळाबाहेर, पायरीवर येऊन बसे व रामायण कान देऊन ऐकत असे. रामायण संस्कृतमध्ये असल्यामुळे अशिक्षित हरीजनाला त्यातला एक शब्द देखील कळत नसे. परंतु तो रामावर इतकी भक्ती करायचा की रामायण ऐकताना त्याला

ती

त्या समोर रामच दिसे. काही
ओळखले. यमदेवाने त्याला स्वर्ग
अंत आश्चर्य वाटले. त्यावर यम
ब्राह्मणच थोर आहेस. कारण तू
जाने केलीस श्रद्धेने तुझ्या मार्गात
त्या अर्थाने भक्त होतास म्हणून

अशा प्रकारे कुठलाही भक्त
भक्तीच्या सामर्थ्याने अशक्य वाट
मी माझे माता-पिता व भा
अगदी मनापासून करतो व सर्व गो
मी माझ्या अनुभवांनी साई
माता-पिता गुरू व ईश्वर मानले व
सुखानी व गुणानी संपन्न राहू. सं
होतात व जीवन आनंदाच्या प्रका
साई-भक्त फक्त एकाच बाब
जो."

# आमुची साईमा



टळती अपाय

श्रीसाईबाबांचा मी एक छो
मोठा होऊ लागलो व मला बोल
साईबाबाच होते. परंतु मागील का
भावडू लागले आहेत.

त्याच्या समोर रामच दिसे. काही काळानंतर मृत्युने त्याला आपल्या घरी परत बोलावले. यमदेवाने त्याला स्वर्ग लोकात जागा दिली. हे बघून त्या हरीजनाला अत्यंत आश्चर्य वाटले. त्यावर यमाने त्याचे कारण सांगितले की हे महापुरुषा! तू खरोखरच थोर आहेस. कारण तू जी भक्ती केलीस ना ती अगदी निर्मळ व शुद्ध मनाने केलीस श्रद्धेने तुझ्या मार्गातील जागा कधीच सोडली नाही. तू रामाचा अगदी खऱ्या अर्थाने भक्त होतास म्हणून तुला हे पद आज मिळू शकले आहे.

अशा प्रकारे कुठलाही भक्त आपल्या जीवनातील कुठल्याही अवस्थेत आपल्या भक्तीच्या सामर्थ्याने अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य करू शकतो यात शंकाच नाही.

मी माझे माता-पिता व भाऊ-बहिणी साईभक्त आहोत. आम्ही बाबांची भक्ती अगदी मनापासून करतो व सर्व गोष्टींनी सुखी आहोत.

मी माझ्या अनुभवांनी साईभक्तांना सांगते की, बाबांना आपण जर आपले माता-पिता गुरू व ईश्वर मानले व त्यांची पवित्र मनाने भक्ती केली तर आपण सर्व सुखानी व गुणानी संपन्न राहू. संकटाचे काळे सावट श्री बाबांच्या भक्ती-तेजाने दूर होतात व जीवन आनंदाच्या प्रकाशात न्हाऊन निघते.

साई-भक्त फक्त एकाच वाक्यावर जगतात– "अपनी भक्ती और साई की शक्ती."

# आमुची साईमाऊली करी कृपेची साऊली

—रत्नाकर देवीदास मुळीक
वर्ग ५वा, वय १० वर्षे
उंटखाना बसस्टॉप, अशोक चौक
(शिंगणे यांचे घरी)–नागपूर

"शिरडीस ज्याचे लागतील पाय
टळती अपाय सर्व त्याचे"

श्रीसाईबाबांचा मी एक छोटा बालभक्त आहे. जेव्हापासून मी थोडा थोडा मोठा होऊ लागलो व मला बोलता येऊ लागले तेव्हा मला सर्वात आवडते माझे आईबाबाच होते. परंतु मागील काही वर्षापासून मला श्री साईबाबा देखील फारच आवडू लागले आहेत.

मी दरवर्षी आईबाबांसोबत शिर्डीस जात असतो. सर्वप्रथम जेव्हा मी साई-बाबांची मूर्ति पाहिली तेव्हा साईबाबा आपल्याकडे प्रेमळ दृष्टीने बघत आहेत, असे वाटू लागले, व लहान मुलांना आपली आवडती वस्तू मिळाल्यावर जो आनंद होतो तसाच आनंद मला झाला. आमच्याकडे जर कधी संकट अथवा दुःख आले तर आम्हाला साईबाबांचाच आधार असतो. त्यांची उदी लावली आणि आशिर्वाद-दर्शक प्रतिमा पाहिली की, सर्व चिंता नष्ट होतात. बाबांच्या कृपा प्रसादाने मी दर-वर्षी पास होत आहे.

आम्हाला जेव्हा सुट्टी असते तेव्हा आम्ही पतंग, विटीदांडू किंवा इतर दुसरे खेळ खेळत नाही तर पुठ्ठ्यांचे साईमंदिर बनवतो त्यात साईबाबांचा फोटो अथवा छोटी मूर्ती ठेवून सर्व मित्रपरिवारासह आपापल्या परीने साईबाबांचे पूजन करून सामूहिक आरती व प्रसाद करतो. त्यावेळी साईबाबा आमच्या सोबत हसत खेळत आहेत असा भास होतो. मी माझ्या मित्रांना शिर्डीहून आणलेले ताईत, अंगठ्या देतो. साईबाबांना ओळखत नसलेली मुलेही आमच्या सोबत खेळतात. ती मंडळी नकळतच साईबाबांची पूजा करतात, व अशा प्रकारे आमचा चिमुकला साईभक्त-परिवार वाढत आहे.

मी नेहमी साईगीता, साईमहात्म्य व साईलीला वाचीत असतो. मला व माझ्या मित्रांना नेहमी साईबाबांची गोडी लागावी व चांगला नागरिक बनून सर्वांची सेवा करावी अशी इच्छा व शक्ती साईबाबा आपल्या आशिर्वादाने मला प्रदान करोत हीच साईचरणी प्रार्थना आहे.

"ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे
त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे ॥"

# साई तारी त्याला कोण मारी

—कु. अरविंद नलावडे
२६/५२७, रेनॉल्ड्स रोड,
बी. पी. टी. कॉलनी वडाळा ३७

● मी बारावीचा विद्यार्थी आहे. मला या वर्गात सर्व विषय सोपे वाटायचे, परंतु 'बुक किपींग' या विषयात खूप अडचणी यायच्या. या विषयात मी परीक्षेत नापास होईल असे वाटायचे. मी परीक्षेसाठी या विषयाचा म्हणावा तसा अभ्यास केला नाही. मला पेपरही तसा काही अवघड गेला नाही, परंतु पास होण्याची खात्री नव्हती. मी निकालाच्या दिवशी बाबांच्या तसबिरीला नमस्कार करून म्हटले, मला पास करा व निकालावर पासच येऊ दे. जर असे झाले तर मी हा अनुभव आपल्या 'साईलीला' या मासिकात देईन. नंतर मी कॉलेजला जाऊन निकाल आणला. तर काय चमत्कार मी चक्क पास होऊन मला 'हायर सेकंडक्लास' मिळाला होता ही सर्व बाबांची कृपा असे मला तरी वाटले.

माझ्या वचनाची पूर्ती व्हावी म्हणून हा अनुभव 'साईलीला' या मासिकासाठी पाठवित आहे.

# श्रद्धा आणि सबुरी असायला पाहिजेच....

—कु. सीमा प्रभाकर कर्पे
५/२ काछीमोहल्ला इन्दौर ७

● आमचे वडिल (बाबा) दाहोदला नोकरीनिमित्त एकटेच राहतात. आम्ही सर्व भाऊबहिण इंदूरला शिकतो म्हणून आई येथेच राहते. घरापासून दूर असल्यामुळे बाबांना आमची आणि आम्हाला बाबांची रोज आठवण येत असते. घरी असताना बाबा आम्हाला आणि गावाला असताना शेजारच्या लहान मुलांना रोज फिरायला घेऊन जात असत. एकदा काय झाले, गावाला फिरायला जाताना बाबांच्या सायकलचा ब्रेक तुटला आणि त्यांना अपघात झाला. बाबांना खूप लागले आणि पुढे सीटवर बसलेल्या मुलाच्या दोन्ही पायात फ्रॅक्चर झाले. बाबा एकटे असल्याने आम्हाला अपघाताची खबर मिळाली नाही. बरेच दिवसापासून खुशालीचे पत्र आले नाही म्हणून आम्हाला काळजी वाटली व आम्ही सर्वजण गावाला गेलो. तेथे गेल्यावर आम्हाला सर्व प्रकार कळला.

रोज फिरायला घेऊन जाताना काही न बोलणारी बाई (त्या मुलाची आई) आज मुलाला अपघात झाल्यामुळे बाबांना बरे वाईट बोलत होती. आजचे युग कोणाचे भले करण्याचे नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाले होते.

आम्ही रोज संध्याकाळी साईबाबांना म्हणायचो की आमच्या बाबांना आणि त्या मुलाला लवकर बरे करून द्या. कारण त्या बाईची बडबड आता नकोशी झाली होती. ती रोज बाबांना म्हणायची—तुमच्यामुळे माझा मुलगा लंगडा झाला. आता त्याचे कसे होईल?

एक महिना सतत दवाखाना झाला. शेवटी साईबाबांच्या कृपेने बाबा आणि तो मुलगा एकदम छान झाले. त्या मुलाचे दोन्ही पाय छान झाले व तो पूर्वीसारखा धावू पळू लागला. इतकेच काय त्या मुलाच्या वडिलांचे ट्रान्सफर पण एकदम दुसऱ्या गावाला होऊन गेले. ते बिऱ्हाड गाव सोडून निघून गेले. अशा रीतीने आमच्या बाबांवर आमच्यावर आलेले संकट साईबाबांनी दूर केले.

साईबाबा सर्वांकडे लक्ष देतात. फक्त श्रद्धा आणि सबुरी असली की सर्व ठीक होते.

☆

# शिर्डी माझे आजोळ

—कु. श्रीकांत दामोदर जेऊरकर
वय १२ वर्षे
१०, साईधाम, नानाशंकरशेठ पथ
विष्णूनगर गोपी टॉकिज समोर
डोंबिवली (पश्चिम)

● आम्हा मुलांना दोन मोठया सुट्टया असतात. दिवाळीची व मे महिन्याची सुट्टी. सुट्टी म्हटली की, आम्ही मुले आमच्या आजोळी जाण्यास उत्सुक असतो. आम्ही पण आमच्या आजोळी जाण्याच्या आनंदात असतो. आमचे आजोळ म्हणजे शिरडी.

माझे आईवडील साईभक्त आहेत. त्यामुळे आम्हास साईबाबांची लहानपणापासूनच ओढ आहे. बाबांनी शिरडी बसची तिकिटे काढून आणली की, आम्हास कोण आनंद होतो. आम्हास आमचे आजी आजोबा भेटणार. आजी म्हणजे साईमाऊली व आजोबा म्हणजे साईबाबा.

आम्ही आतापर्यंत अनेक वेळा शिर्डीस गेलो आहोत. तेथे आमचा मुक्काम फक्त ३ दिवस असतो. पण त्या तीन दिवसातील गोड आठवणी शिर्डीस परत जाई पर्यंत ताज्या राहतात.

साईबाबांच्या हस्ते पुनीत झालेली लेंडीबाग तर आमचे आवडीचे ठिकाण. तिथे असलेले ससे, हरणे, मोर इ. मित्रांचे खेळ पाहण्यात आमचा वेळ चांगला जातो. बागेतील नंदादीप, दत्तमंदिर व श्यामसुंदर घोड्याची समाधि यामुळे साईबाबांच्या वास्तव्याची जाणीव सतत मनात होत असते.

तसेच संस्थानची लायब्ररी माझे आवडीचे ठिकाण. तिथे जाऊन मी साईबाबांवरील अनेक चित्रे व पुस्तके पाहिली आहेत. थोडेसे वाचन केले आहे. बाबांचे समाधि मंदिर व भोवतालचा परिसर हे भाग माझे विशेष आवडीचे आहेत. आईवडील जास्तीत जास्त वेळ समाधि मंदिरात बसलेले असतात. त्यावेळी मी व माझी छोटी बहिण इतरत्र खेळत असतो. कितीही गर्दी असली तरी आमची कधीही चुकामूक होत नाही. खेळताना मधेच मी साईबाबांच्या मूर्तीकडे बघतो तेव्हा ते मोठ्या प्रेमाने आमच्याकडे बघतात असे वाटते.

गेल्या वर्षी जून मध्ये शिरडीस गेलो होतो. निघण्यापूर्वी माझा व आईचा थोडासा संवाद झाला. मी तबला शिकतो. व्यास संगीत विद्यालयाची पहिली परिक्षा पास झालो आहे. तेव्हा मी आईस प्रश्न केला की, "मी समाधि मंदिरात तबला वाजवू का ?" तेव्हा ती म्हणाली, "बाबांच्या देवळात मोठमोठे कलाकार येतात. तू तर खूप लहान आहेस. साईबाबांच्या मनात असले तरच संधी मिळेल." आणि खरंच दुसऱ्या दिवशी मला तबला वाजवण्यास संधी मिळाली. तो मी साईबाबांचा फार मोठा आशिर्वाद मानतो. ऑगस्ट १९८० च्या साईलीला मासिकात माझे नाव छापून आले आहे.

साईबाबांचा प्रसाद म्हणून आम्ही नेहमी संस्थानगृहात जेवतो. घरी तिखट जेवण नको म्हणून हट्ट धरणारे आम्ही तेथील जेवण मिटक्या मारीत खातो. त्या जेवणाची गोडी काही औरच. समोर साईबाबांची भव्य प्रतिमा असते. त्या प्रतिमेच्या

मुसलमान त्याच देवाला अल्ला म्हणतात. मुसलमान ज्या आकाशाखाली रहातात त्याच आकाशाखाली हिंदुही रहातात. जे पाणी हिंदु पितात तेच पाणी मुसलमान घेतात. जो अग्नि मुसलमानांचे अन्न शिजवतो तोच हिंदुचेही अन्न शिजवतो. फरक कुठे आहे? ईश्वर सर्वांची शरीरे सारखीच निर्माण करतो. त्यावर धर्माची, जातीची वस्त्रे चढवण्याची गरज नाही. एकसारखे शरीर असणाऱ्या माणसाला हिंदु-मुसलमान का म्हणता? मानव एकच आहे कोणी उच्च नाही. कोणी नीच नाही याच दृष्टी-कोनातून त्यांनी त्यांना खंडोबाच्या देवळात प्रवेश नाकारणाऱ्या म्हाळसापतींना उपदेश केला 'ईश्वराला जात नाही, माणसाला कशाला हवी?' याच दृष्टीकोनातून त्यांनी त्यांची न्यायालयीन चौकशी करावयास आलेल्या न्यायालयीन कमीशनला माझी जातकबीराची जात आहे असे सांगितले. ते म्हणत इन्सान का धर्म है इन्सानियत! प्रेम, सत्य और शांती! यही एक धर्म है जिसका मैं पालन करता रहा!

बाबा दररोज गावात भिक्षा मागावयास जात. अशाच एका भिक्षेच्यावेळी त्यांनी त्यामागचा अर्थही बायजाबाई कोते पाटील हिच्याकडे स्पष्ट केला होता. त्यांनी तिला सांगितले–तुम्हाला भिक्षा घालायला लावून मी तुमच्याकडून परमार्थ करवून घेतो. आल्या गेल्या अतिथीला, गोरगरीब, बैरागी, गोसावी यांना भिक्षा घालावीच या निमित्ताने तुमच्याकडून दान दिले जाते. पुण्य घडते. तुमचे क्लेश कमी होतात.

काहीजण माया, मोहाचे पाश न तोडताच भगवी वस्त्रे धारण करून संन्यास घेतात. अहंकाराचा त्याग न करताच संन्यास घेतल्याने पुढे त्यांना त्रासच होतो. आध्यात्मिक उन्नती करून घेऊन मुक्ती मिळवण्याची इच्छा असलेल्या भक्तांना ज्ञान बोध करताना बाबा सांगत. संन्यास घेण्यापूर्वी शरीरावरील अहंकाराची वस्त्रे काढून टाका आणि मग भगवी वस्त्रे घाला. भगवी वस्त्रे घातल्याने अहंकार जातो असे होत नाही. अहंकार काढायला आसक्तीचा बळी घ्यावा लागतो. आसक्ती जाऊन माणूस विरक्त झाला म्हणजेच अध्यात्माची चढण चढता येते. ज्ञान हे शेवाळाने झाकलेल्या पाण्यासारखे आहे. ते शेवाळ बाजूला सारले तर आधीच खाली असलेले निर्मळ पाणी आपल्याला स्पष्ट दिसून येते. ज्ञानाचे सुद्धा असेच आहे. गुरु हे ईश्वरी ज्ञान सांगत नसतो ते प्रत्येकात आत्मस्वरुपात असतेच म्हणून तो बोलण्याचा विषय होत नाही तो आहे अनुभूतीचा विषय. गुरु उपदेशाचे जे शब्द सांगतो ते डोळ्यातील मोतीबिंदू काढायच्या शस्त्रासारखे असतात. त्याने हा अज्ञानाचा मोतिबिंदू काढला की, माणसाला आपोआप ज्ञान दिसू लागते. ज्ञानाला झाकणारे हे अज्ञान दूर होईल तेव्हाच सर्वांतर्यामी असलेल्या ईश्वराची जाणीव होते. स्वतःमध्ये,

चेहऱ्याकडे बघितल्यास असे वाटते की, साईबाबा आम्हास पोटभर व सावकाश जेवा असे प्रेमपूर्वक सांगत आहेत.

अशा तऱ्हेने आजोळचे वात्सल्य कधी संपते ते कळत नाही म्हणून जाता जाता मनात येते की—

" शिर्डी माझे आजोळ
साईबाबा किती प्रेमळ
कौतुके पाहती खेळ
आम्हा बाळांचे लडिवाळ ! "

☆

# श्री साईबाबांची उपदेशवाणी

—सुरेशकुमार पांडुरंग धुरी
७४/२१९७ पंतनगर, घाटकोपर मुंबई ७५

● बाबा स्वतः पूर्णावतार होते. येतानाच श्रीकृष्णासारखा दिव्यत्वाचा वारसा घेऊनच ते जन्मास आले होते. त्यामुळे चमत्कार हा त्यांचा स्वभाव होता. सिद्धी त्यांना मिळवाव्या लागल्या नाहीत. त्या स्वयंसिद्धच होत्या. पूर्णावतार आवश्यकतेनुसार क्वचितच येत असले तरी संतांच्या रूपाने ईश्वरी शक्तीचे कार्य सतत चालूच असते. संत एकाच वेळी अनेक ठिकाणी जन्म घेतात. संतांचे कार्य दुबळे ठरले तरच अवताराची आवश्यकता निर्माण होते. एरवी अवताराचे कार्य सतच चालू ठेवतात. सत्पुरुष निर्माण करण्यासाठी बाबांसारखे अवतार आपल्या सिद्धी आपल्या शिष्याला अथवा भक्तालाही सहज देऊ शकतात. बाबांनी आपले जीवन कार्य १८५८ साली धूपगाव जवळील जंगलात प्रगट झाल्याबरोबर धूपगावचा पाटील चांदभाईकडे प्रगट केले होते. त्यावेळी बाबा म्हणाले होते. एक दुसरोंपर प्रेम करना जरुरी है। आणि म्हणुन मी आलो. प्रेमाचा दिव्य संदेश देण्यासाठी हिंदु-मुसलमान हे माणसामाणसातले भेदभाव बाबांना मान्य नव्हते. ते म्हणत मला हिंदु-मुसलमान सर्व सारखेच ! अरे आपण सारी अल्लामियाची लेकरं. हिंदु अल्लाला देव म्हणतात

प्रत्येक सचेतन आणि अचेतन वस्तूतील सुद्धा ईश्वराच्या एकत्वाची अनुभूती मिळते. ती अनुभूती शिष्यांना व्हावी म्हणून गुरु फक्त त्यांचे अज्ञान दूर करतो. त्यांना अज्ञान म्हणजे काय? हे समजावून सांगतो. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे सहा विकार म्हणजेच माया. ह्या अज्ञानाचे मूळ कारण असते. या सहा विकारांना बाजूला सारल्यानंतरच अध्यात्माचा साक्षात्कार होऊन अखिल विश्वातील चैतन्याची व अचेतनाचीसुद्धा वेगवेगळी रूपे म्हणजेच आपण अशी भावना निर्माण होते. 'अहं ब्रह्मास्मि'चा साक्षात्कार होतो. ब्रह्म म्हणजेच अध्यात्म! अहं ब्रह्मास्मि! मीच ब्रह्म आहे, मी च या ब्रह्मात सर्वत्र भरलेला आहे. ही भावना हेच ब्रम्हाचे मर्म. या ज्ञानाच्या आड येणारे अज्ञान गुरुच्या उपदेशाने समजून येते– आणि त्यामुळेच ते दूर करण्याचे उपायही त्याला कळून येतात.

मानवजन्म ही मुक्तीकडे नेणारी शिडी आहे. जन्ममरणाच्या फेऱ्यातून बाचायच असेल तर निष्पाप जीवन जगावे. सर्व विषयांचा त्याग करावा. कारण विषयातून आसक्ती आणि आसक्तीतून पूनर्जन्मात कर्म आणि त्यातून परत जन्म, हे चक्र चालूच रहाते. त्यातून ऋण, वैर आणि हत्या यातर जन्मोजन्मी पुरतात! ब्रम्हज्ञान मागायला आलात आणि मोह मात्र सुटत नाही पैशांचा असे होऊ देवू नका. असे का ब्रम्हज्ञान मिळणार आहे कुणाला? ब्रम्हज्ञान मिळवायला पहीलीं काढली पाहिजेत अहंकाराची पुटे! अहंकारापायी निर्माण होणाऱ्या आसक्तीचे आवरण आसक्तीतून निर्माण होतो मोह, लोभ, काम, क्रोध, मद, मत्सर सर्वच! ब्रम्ह म्हणजेच ईश्वर त्या ईश्वरापासून माणसाला दूर नेणारे हे शत्रू आहेत! माणूस माणसाला ओळखत नाही या पैशांपायी! सर्व गोष्टी माझ्याच संकल्पाने घडतात. बऱ्यावाईट कृतीचे, कर्तृत्वाचे स्वामित्व स्वतःकडे घेऊ नका! प्रत्येक गोष्ट ईश्वराच्या ईच्छेने घडते! हे साधे तत्व लक्षात घेऊन आपली प्रत्येक बरीवाईटकृती आणि विचार ईश्वराला अर्पण केलेत म्हणजे त्याने कर्म बांधले जाणार नाही. तुमच्या मनाला त्रास होणार नाही. भक्तीशिवाय कोरड्या ज्ञानाने परमेश्वर प्राप्त होत नाही. त्याला प्राप्त करुन घेण्यासाठी केवळ ज्ञान उपयोगी पडणार नाही. श्रवण, किर्तन, ईशस्मरण, चरणसेवा, अर्चना, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन हे प्रेमपूर्वक करायचे भक्तीचे प्रकार होत. यातील एका प्रकाराने जरी तुम्ही हरीची मनःपूर्वक भक्ती केलीत तरी तो विष्णु तुमच्या घरी तुमच्या हृदयात प्रगटेल. आणि त्याने तुम्हाला अनुपम शांति आणि अनन भूत मानसिक एकाग्रता लाभेल! ईश्वराने दिलेल्या या नवविधा भक्तीमार्गातील एका भक्तीमार्गाला आपण चिकटून राहीलो तरी खरीखुरी ज्ञानप्राप्ती होऊन ईश्वरी कृपेचा लाभ होईल. माणूस नालायक नसतो. त्याचे दैव नालायक असते. पूर्वजन्मी तो झक मारतो आणि दुर्दैवाचे ताट भरून घेऊन जन्मास येतो. त्यातून

बाहेर पडायला गुरुची गरज लागते. सद्‌गुरु तुम्हाला तुमच्या प्रत्येक संकटातून बाहेर काढण्यासाठी असतात हा विचारच चुकीचा आहे. मृत्यू, संकटे, भोग, श्रीमंती, दारीद्र्य हे सर्व पूर्व-प्राक्तनावर अवलंबून असतात. ती तुमच्या पूर्वकर्मानुसार तुमच्या जीवनाची ईश्वराने विचारपूर्वक केलेली आखणी असते. त्या योजनेनुसार सर्व सृष्टीचे नियमन असते. माणसाची हुशारी येथे कामी येत नाही. पण मनुष्य सद्‌गुरुच्या छत्राखाली गेला की त्याला मार्गदर्शन मिळते त्याची बुद्धी समतोल होते. संकटाला तोंड दयायची शक्ती आणि आत्मविश्वास त्याला लाभून त्याचे मन कोणत्याही प्रसंगात शांतच रहाते. बाबांनो तुमचे काम निरपेक्ष भावाने करा. कुठलेच काम हलके नसते ! कोणतेही काम सचोटीने करा. त्यासाठीच आपल्याला देवाने जन्माला घातले आहे. वाईट काम मात्र करू नये. आपण करतो हा अहंकार समूळ काढून टाकून त्याच्या परीणामाची जबाबदारी माझ्यावर टाका ! मला शरण या म्हणजे तुमची जबाबदारी मी घेईन ! तुमचे हित मीच पाहीन ! नाकाने कांदे सोलू नका ! प्रेमाने वागा साऱ्यांशी ! तुम्ही तुमच्या धर्माचे वागा–दुसऱ्यांना त्यांच्या धर्माने वागू द्या ! दुसऱ्यांवर टिका करू नका. कोणाची निंदा-नालस्ती करू नका. कोणाला अपशब्द बोलू नका ! तसे केले तर सर्व मलाच लागते ! कारण सर्वांच्या अन्तर्यामी मीच आहे !

माणसामाणसात, पशुपक्ष्यात मीच आहे. माझ्यावर तुम्ही प्रेम करता. तसेच सर्वांवर करा ! काहीही करत नसलात तरी तोंडाने राजाराम, राजाराम, म्हणत जा तो रामराय खरेच तुमचे कल्याण करेल. जर तुम्ही सर्वांवर प्रेम केलेत तरच तुम्ही माझ्यावर प्रेम केलेत असे होईल. तुमच्या माझ्यातला मी-तू पणाचा बांध काढून टाका ! तुम्ही म्हणजेच मी ! मी म्हणजेच तुम्ही ! हे लक्षात ठेवा. म्हणजे तुमचे कल्याण होईल. प्रथम घरातील मुलाबाळाना जेवायला वाढा मग मला नैवेद्य दाखवा 'घरच्या देव्हाऱ्यातला देव उपाशी ठेऊन बाहेरचा देव कसा पावेल तुम्हाला ?' एकदा बाबांची एक निकटवर्ती भक्त लक्ष्मी हिने बाबांसाठी भाकऱ्या भाजून आणल्या आणि बाबांनी त्या द्वारकामायीच्या पायरीवर बसलेल्या कुत्र्याला खायला घातल्या. लक्ष्मीने विरोध करताच बाबा माधवरावांना म्हणाले श्यामा, अरे वेद, उपनिषद वाचून ज्ञान पचविता येत नाही. त्याला अध्यात्म अंगात बाणावे लागते. अध्यात्म वाचून समजत नाही. आचरून समजावे लागते। विद्वानांना जे समजले नाही ते या खेडवळ लक्ष्मीला कसे समजणार ? पहा, ती म्हणते मी कशाला या कुत्र्याला भाकर खायला घातली ? लक्ष्मी, अग मी आणि हा कुत्रा वेगळा का आहे ? त्याला भूक लागली मला ती जाणवली कारण एकच आत्मा त्याच्यात आणि माझ्यात आहे. त्याच्या तुमच्या सर्वांच्या आत्म्याच्या संवेदना माझ्या आत्म्यावर येवून

आवडतात ! कारण माझी सर्वांशीच एकात्मता आहे. मला त्या समजल्या की मी धावतो तुमच्या मदतीसाठी ! तुम्ही मला कुणा मानता कमी लेखता. मी मानतो तो ईशाच अंश साक्षात आत्मा ! आत्मा एकच. आत्म्याला नाही उच्च-नीच जात-पात लिंगभेद, योनीभेद, वर्णभेद ! हे तुमच्या लक्षात यावे म्हणून मी धडपडतो. कोणाला कमी लेखू नका. कोणाशी वाईट वागू नका.

परमेश्वराने सौंदर्य निर्माण केले आहे ते दृष्टीने टिपण्यासाठी. दृष्टी तिचे काम करेल. मनाला मात्र ताब्यात ठेवा. कारण ते निष्पाप बनणे कठीण आहे. त्याला आवर घाला. म्हणजे ते बनता बनता निष्पाप बनेल. स्त्रीकडे आई म्हणून आपण पाहिले तर जगातल्या सर्वोच्च भावनेचा आनंद आपण घेवू शकतो. निष्पाप दृष्टीच फक्त लिंगभेदाच्या भिंतीतून अध्यात्मिक तेजाकडे पोहोचू शकते. त्या तेजात असते निर्व्याज प्रेम ! जगातील सर्वोच्च मंगलभाव ! ईश्वररूप !

इतक्या पोथ्या वाचून काढतो पण पोथीतला ईश्वर तुम्हाला समजत नाही. अरे तो साऱ्या माणसामाणसात आहे आणि माणूस म्हणून फिरतो आहे तोच तुम्हाला दिसत नाही. काय उपयोग त्या पोथ्यांचा ? माणसांवर प्रेम करायला शिका मग या पोथ्यांची सुद्धा गरज नाही. ईश्वराची कृपा मिळवायला. अन्न हे परब्रम्ह आहे त्याला पाठ देवू नका. आत्माराम थंड ठेवा आणि गुरुवर विश्वास ठेवा. त्याने तुमचे कल्याण होईल. उपास-तापास करून का देवाची अन् गुरुची कृपा होते ? उपास करणे म्हणजे आत्म्याला पीडा देणे होय ! भुकेने कळवळलेला आत्मा परमात्म्याशी एकात्मता पावु शकत नाही. परमात्म्याचा शोध घेवू शकत नाही. महारोग्यांपासुन आपण दूर राहू पहातो परंतु आपण दूर राहिल्याने रोग पळून जाईल का ? त्यांचा पूर्वजन्मीचा भोग असतो म्हणून भोगत असतात बिचारे. आपल्याला भिण्याचे कारणच काय ? आपल्या भाग्यात बरे व्हायचे नसले तरी घाबरू नका. तो भोग आहे. तो भोग भोगून काढा. त्यापासून भागण्याचा प्रयत्न कराल तर पुढील जन्मी परत भोग घेऊन जन्मास याल. माझ्या संचाराला भिंती, दार, अंतर यांची तटबंदी आड येत नाही ! मी शरीराने हिंडत नाही. मनाने हिंडतो. म्हणून तुम्ही जगात कोठेही असलात तरी तुमच्या पाठीशी मी आहेच. हे लक्षात ठेवा. तुम्ही माझ्याकडे पहा, मी तुमच्याकडे पाहिन ! वाटेत कोणी दुःखी भुकेला दिसला तर त्याची सेवा अगोदर करा ! देव दिसला तर त्याचे दर्शन घ्या आणि मग या माझ्या द्वारकामाईत ! मी पळून जाणार आहे का कुठे ? प्रथम मानव सेवा नंतर ईश्वरसेवा व शेवटी संतसेवा करा ! शकून आणि अपशकून याची चिंता तुम्ही का करता ? शरीर हे काचेप्रमाणे नाशवंतच नाही का ? शरीर पडणारच. पण आत्मा अमर आहे. त्याचा आविष्कार करा.

बाबांच्या हातात आपले नशीब बदलायची शक्ती नाही असे नाही. पण प्रारब्ध हे आपण आपल्या गतजन्मीच्या कर्माने बांधून घेत असतो. बाबांनी ते बदलणे योग्य होणार नाही. ईश्वरी योजनेत ते ढवळाढवळ करू लागले तर विश्वरचाला आपले कार्य करणे अवघड होवून बसेल! बाबांवर विश्वास ठेवा. त्यांच्यावरची श्रद्धा कमी करू नका म्हणजे तुमचा सारा भार बाबाच वहातील!

★

# माझे साईबाबा

—कु. निता सुरेश सहामते
मु. पो. चिंचणी, तालुका डहाणू,
जिल्हा ठाणे पीन ४०१५०३

● अहो हे माझे बाबा ह्या म्हणण्यानेच मला किती आनंद होतोय सांगू! कारण ते आहेत माझेच बाबा निरागस, शांत व सतत आनंदी असणारे बाबा! परंतु मित्रानो तुमचे बाबा प्रत्येकांचे वेगळेच असतील परंतु ओळखा पाहू माझे बाबा कोण? ओळखलत का! नाही ना? माझे सा+आई=साईबाबा माझ्या आई-सारखेच माझ्यावर प्रेमाचा वर्षाव करणारे, सतत माझी काळजी वाहणारे त्याचप्रमाणे आमच्या बाल-गोपाळांशी सदैव हसत रहाणारे असेच माझे साईबाबा पुष्कळ थोर आहेत, आणि माझ्या बाबांचे नातलग-सगेसोयरे सुद्धा पुष्कळच आहेत त्यांना न ओळखणारे मला तरी वाटते की ते हाताच्या बोटांवरच मोजता येतील.

बरे माझे साईबाबा आहेत सुद्धा खूप-खूप मायाळू. कुणीही त्यांचा भक्त अडी-अडचणीत किंवा एखाद्या प्रसंगात असो माझे बाबा सदैव हजरच. कारण बाबांनी म्हटलेलेच आहे की ' जो जो मज भजे, जैसे जैसे भावे तयाचा मी ऋणी सर्वकाळ. परंतु माझ्या बाबांना मनापासून केलेली भक्तीच आवडते. त्यासाठी बाबांनी व्यवहारात ज्याप्रमाणे एकाच नाण्याला दोन बाजू असतात त्याचप्रमाणे बाबांच्या भक्तीरूपी साधनेत श्रद्धा व सबूरी ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू होय,

आपल्याला कोणत्याही क्षणी जावे लागणार आहे या भावनेने प्रत्येक क्षण ईश्वरचिंतन आणि मानवसेवेत घालवा ! मानवसेवेची संधी शोधत रहा ! मानवसेवेशिवाय घालविलेला प्रत्येक दिवस ईश्वर भक्तीशिवाय व्यर्थ घालविलेला दिवस समजा. हा साई कोणाचा मृत्यू टाळत नसला तरी अपमृत्यूला परतवून लावतो. गंडांतराला तोंड द्या. कोंडून घेवून ते टळणार नाही. संतांपाशी जावून साधी सहनशीलताही आपणास साध्य करता आली नाही तर सत्संगाने आपण काय साधले असा प्रश्न प्रत्येक भक्ताने स्वतःला विचारून आपले आत्मनिरिक्षण करावे. सहनशीलता हीच परस्परप्रेमाची पहिली पायरी आहे. माया, मोह अन पाश तुटण्यासाठी दारिद्र्यासारखी साधना नाही. विनम्रता हा आध्यात्मिक प्रगतीचा पाया आहे. कोणी बरोबर असो वा नसो ईश्वराला स्मरून त्यालाच सर्व अर्पण करा. मग ते खाणे असो, पीणे असो, कपडा असो काहीही असो ! असे केल्याने त्याच्या बऱ्या वाईट परिणामाची जबाबदारी तुमची रहात नाही. जेवणापूर्वी नाही का तुम्ही देवाला अन्न अर्पण करीत ? जेवायला बसण्यापूर्वी अतिथीला, प्राणीमात्राला जेवायला घालायची तुमची पद्धत नाही का ! मग लहानसहान गोष्टीत तरी का विसरता देवाला ? प्रत्येक गोष्ट देवालाच अर्पण करा आणि मगच ग्रहण करा. सुख आणि दुःख ईश्वरदत्त असतात. सुख आणि दुःख आपली समजण्याचा अहंकार बाळगला नाही तरी ईश्वरी साक्षात्काराचा अनुभव आपणास सहज मिळवता येईल. अहंकार हे विष असते. नागाच्याही जहरापेक्षा भयंकर ! एकदा का हे जहर माणसात भिनले की निघता निघत नाही ! देव तारी त्याला कोण मारी हे जरी खरे असले तरी देवावर तरी विश्वास हवा ना !

माधवराव देशपांड्याकडून सुरवातीस बाबांनी दोन रुपये दक्षिणा मागून घेतली व त्यामागचा अर्थही विषद करून सांगितला. ते म्हणाले शामा एका रुपयाने होणार नाही. दोन दे ! तुझ्यातला द्वैतभाव काढून टाक. आपला गुरु वेगळा अन् दुसरा संत वेगळा असे मानू नकोस. ईश्वराच्याच निरनिराळया स्वरुपाविषयीची ही तुझी द्वैतभावना दूर कर एकनिष्ठ असावे पण द्वैतभाव ठेवू नये ! या उपदेशाला अनुसरून बाबा म्हणजे परमेश्वर. बाबा हेच इष्टदेवता, बाबा हेच कुलदैवत असे मानून कुलदेवतेचा नवस बाबांकडेच फेडायचे ठरवले. तेव्हा बाबांनी सांगितले– कुलदेवतेचा मान असतो. कुळाचार हे पाळावेच लागतात. परमेश्वरही एकच शक्ती असली तरी त्याला प्रत्येकजण वेगवेगळया स्वरुपात भजतो. प्रत्येक कुटुंब आपल्या पूर्वापार रुढीप्रमाणे त्याच शक्तीची आपल्या परंपरेप्रमाणे कुलदैवत म्हणून पूजा करते. त्या कुलदेवतेला संतुष्ट ठेवले म्हणजे कुळाचे रक्षण होते. कुटुंबाची भरभराट होते.

मला बाबा खूपच आवडतात कारण मी बाबांना कधीही पाहिले की मला ते आशीर्वाद देत असतात अर्थातच सगळ्या जगाला सांगतात की तुम्ही काहीही केलें तरी मला शेवटी समजणारच, तरी तुम्ही (प्रत्येकाने) चांगले कार्य करा फळाची अपेक्षा बाळगू नका. कोणाला काही न देता आले तर निदान त्यास हसतमुख परत परत पाठवा. त्याचा अपमान करू नका–काय विचार आहेत बाबांचे व माझे डोके नतमस्तक होते. बाबांच्या नामस्मरणाने सुद्धा लागलीच आनंद होतो. मला काही सापडले नाही किंवा मी अडचणीत असले की बाबांचे नाव घेते व मला त्यातून मार्ग मिळतो. मी आमच्या गावातील साई मंदिरात जातेच, त्याचबरोबर दर-गुरुवारी आम्ही आरती म्हणतो त्या आरतीत सुद्धा किती आनंद भरला आहे, आणि त्याची चव कोणत्याच गोड पदार्थाला येणार नाही आणि बाबांच्या आरतीतील चालीमुळे आम्ही बाळ-गोपाळ एकरूप होऊन जातो. असे आहेत आमचे, आपले, सगळ्यांचे व माझे जादूगार श्री साईबाबा.

शेवटी एकच विनंती, आम्हा सगळ्यांना चांगली बुद्धी, विद्यादान व बाबांच्या बद्दल सगळ्या-बाळगोपाळांना आणखीन आस्था वाढो हीच साई चरणी प्रार्थना. बरे बाबा तुम्ही ह्या आपुल्या लेकीला चार शब्द लिहिण्यास दिले त्याबद्दल शतशः प्रणाम.

'साई रहम नजर करना
बच्चों का पालन करना'

# माझ्या आधी बाबा जाऊन पोचले

—कुमार सचीन सुभाष कर्णिक
दिवाणजी वाडा–भद्र अहमदाबाद,

● सध्या गुजरात राज्यात हरताळ ताळेबंदी बंद जोरात चालू आहे, आणि त्यात अहमदाबाद शहर म्हणजे तुफानाचे मुख्य केंद्रच म्हणाना.

कोणत्याहि क्षेत्रात हरताळ म्हटला की सर्वात प्रथम हल्ला असतो शाळा, कॉलेजांवर या वेळेस तर तोबाच झाला. अचानक तुफानात ३ महिने शाळा कॉलेज बंद. म्हणजे आम्ही काय शिकलो असणार ते आपणच समजू शकाल!

तो फोटो पहाताच मला आईनी साई चरित्रातल्या सांगितल्या होत्या त्या काही गोष्टी आठवल्या की स्वतःच्या भक्तांचा सांभाळ घेण्यास बाबा कोणत्याही रूपाने तेथे जातात एका भक्ताकडे होळीला जेवण्यासाठी फोटो रूपाने गेले होते तर भक्त देवांच्या घरी व्रत उद्यापनासाठी संन्याशाच्या रूपाने जेवण्यास गेले होते, तसेच आज माझ्यासाठी माझा संभाळ करण्यासाठी माझ्या अगोदर त्या फोटो रूपाने बोर्डीला येऊन राहीले होते, व त्यामुळे आता माझ्या आईची काळजी पण दूर झाली असेल. तिचे पण रडणे जरा कमी झाले असेल.

तुम्ही पण माझ्या आई पप्पांसारखा सर्व भार बाबांवर टाका म्हणजे ते कोणत्याही रूपाने तुम्हास भेटण्यास येतील.

# मी आहे साईबाळ

—कुमार गौरव बिपीन स्वादिया
कमलकुंज, दत्तमंदिर रोड,
मालाड (पूर्व)

असलो जरी मी गुजराती, तरी
मराठी भाषेची मला आवड आहे
' साईलीला ' मासिक वाचण्याचे
मला भलतेच वेड आहे।

कुणी मला विचारले, ' अरे बाळ, तुझे नाव काय ?
आणि तुझ्या वडिलांचे नाव काय आहे ?

तर मी म्हणेन, ' मी आहे साईबाळ आणि साईबाळ
होण्याचे मला अत्यंत गौरवपर आहे ! '

कुणी विचारले मला, ' बरं, तुझ्या आईचे नाव काय ?
हे आता मला सांग बघू ! '

तर माझं उत्तर आहे, ' द्वारकामाई हीच माझी खरी आई
दुसरं काय मी सांगू ! '

अशा ह्या परीस्थितीत आमच्या वाड्यातील बायकांनी कायदा पसार केला. आपण मुलांना महाराष्ट्रात शिकण्यास ठेऊ महाराष्ट्रात म्हणजे कोठे ? विचाराल तर बोर्डीला. मग काय लगेच तपासाची सुरुवात झाली. वेळ मिळेल त्याप्रमाणे सर्वांचे पालक बोर्डीला तपास करण्यास जाऊन आले. तेथे कळले की परीक्षेचा निकाल लागल्याशिवाय काही करता येणार नाही.

माझे दुर्दैव म्हणा की सुदैव म्हणा शाळेची परीक्षा झाली होती व रीझल्ट पण लागला. मग माझ्या उत्साही पप्पांनी लगेच बोर्डीला पत्र व्यवहार करून, इंटरव्ह्यू देऊन मला तेथे दाखल करण्याचे नक्की झाले. १५ जुनला शाळा उघडणार मग काय विचारता जस जसे दिवस जवळ जवळ येत चालले तस तसे माझ्या आईचे रडणे व बाबांची प्रार्थना करणे सुरू झाले. बाबा तेथे पोराला जपा, समुद्रावर जाऊ देऊ नका, तो अजून लहान आहे. खुप दूर जात आहे. मी तेथे त्याला भेटण्यास कशी काय जाऊ शकणार ? ( माझी आई कमरेच्या दुखण्याने आजारी असते ) तुम्ही त्याची सर्व काळजी घ्यायची. वगैरे वगैरे त्याबरोबर माझी तयारी पण सुरू झाली.

सर्वात प्रथम तिने बाबांचा फोटो व उदी माझ्या पेटीत ठेवली. दुसरा फोटो कपाटाला लावण्यास दिला व तो रोज दिसेल असा ठेवण्यास सांगितले. रोज नमस्कार करायचा उदी लावायची काही दुखत असेल बरे वाटत नसेल तर उदीत पाणी घालून पीत जा व बाबांना बरे करण्यास सांगायचे म्हणजे लौकर बरे वाटेल वगैरे वगैरे सुचना पण दिल्या.

मी १५ जूनला रात्री निघणार. आणि दुपारच्या टपालाने शिरडीहून बाबांची उदी व प्रसाद आला. ते पाहून सर्वांना खूपच आनंद झाला.

१५ जूनला आम्ही निघालो. प्रथम बलसाडला माझ्या मावशीकडे गेलो व रविवारी सकाळी बोर्डीला गेलो. तेथे पोचल्यावर हॉस्टेल, माझी खोली आजूबाजूची जागा सर्व काही पाहिले व मग सामान लावण्याची सुरुवात केली. एक छानसे कपाट स्टोअर रूममधून आणले व ते साफ करण्यासाठी म्हणून उघडले तो काय चमत्कार पहा. समोरच मला आशीर्वाद देत श्री बाबा तेथे बसले होते. (त्यांचा एक छोटा फोटो मध्ये होता ) त्यांचा फोटो पहाताच माझ्या रडव्या पप्पांना खुप खुप आनंद झाला त्यांच्या डोळ्यांना जास्तच पाण्याची धार लागली, व दोन्ही हात जोडले गेले. ते म्हणाले बाबा तुम्ही आमच्या अगोदर येवून पोचलात.

कुणी प्रश्न केला, 'अरे मूर्ख मुला, तुझं गाव कुठले ?
आणि तू राहतोस कुठे ?'

मी सांगेन, 'अहो, माझं गाव म्हणजे शिरडी
आणि राहतो मी मनाने पण शिरडीमध्ये'

कुणी विचारेल, 'आता नीट उत्तर दे बरं का ?
पुढे तू काय करणार ?

मी मोठ्याने ओरडलो, "ऐका हो ऐका,
मैं हूं साई का और साई है मेरा।
साईसी माझी दोस्ती आहे,
कधी भांडण, कधी कट्टी तर कधी गट्टी,
साईसी माझी असते !

साई सांगेल तसेच मी पुढे करणार—
त्यांनीच माझं बोट पकडलं आहे
मग मी काळजी कशाची करावी ?

अहो, जगात हाच एक साईनाथ
अत्यंत गोड आहे !

साईनाथ हाच आहे अनंत नाथ आणि
साईनाथाचे मला फार कौतुक आहे !

हे बघा, साईनाथ आता मला गप्प राहाण्यास सांगत आहे, सर्वांना टाटा, करायची श्री साईराम आज्ञा देत आहेत ! अच्छा, येतो मी बरं का !

सद्‌गुरु साईनाथ नाव अमर आहे.

★

# श्रद्धा व सबुरी

—कुमार निशिकांत पेडणेकर
बी. आय. टी. चाळ नं. १
काळबादेवी रोड, मुंबई २ वय १३ वर्षे

मी शिर्डीला फक्त दोनदा जाऊन आलो होतो. तेव्हापासून साईबाबांच्या बहुमोलाच्या श्रद्धा व सबुरीसारख्या दोन वचनांचा लाभ झाला.

माझा मोठा भाऊ एल्फीस्टन टेकनीकल शाळेत शिकत होता. त्या शाळेत सुतारकाम तसेच इतर सर्व टेकनीकलचे विषय व एन. सी. सी. शिकवीत असल्याने मला त्या शाळेत जाण्याची इच्छा होती. त्यावेळेस मी म्युनिसिपल इ. ७ वीत शिकत होतो. मी मनात साईबाबांची श्रद्धा धरून राहिलो. 'आणि मनात म्हणायचो.'

## "साई तारी त्याला कोण मारी"

जेव्हा मी इ. ७ वी पास झालो. तेव्हा माझ्या वडीलांनी माझे त्याच शाळेत नाव घातले. मला साईबाबांच्या कृपेने टेकनीकल सहज मिळाले. माझी खुप इच्छा होती की, मला एन. सी. सी. सुद्धा मिळावी. तेव्हा मी बाबांचे नामस्मरण करायचो.

नंतर एन. सी. सी. च्या सरांनी आमच्या वर्गातील एका मुलाला सांगितले की ज्याना एन. सी. सी. पाहिजे त्यांची नावे लिहून आण व प्रत्येकाकडून १ रु. प्रवेश फी घे. मी सुद्धा माझे नाव दिले. त्यानंतर आम्हाला गुरुवारी स. ८-३० वाजता बोलावले गेले. मी गुरुवारी बाबांची उदी लावून व साईबाबांचे नामस्मरण करीतच शाळेत प्रवेश केला व तेथेच आमची परेड घेतली गेली. तेव्हा सरांनी लहान उंचीच्या मुलांना बाजूला काढले. त्यात मला सुद्धा काढले. माझे मन कावरेबावरे झाले. पण मी बाबांना दोष दिला नाही. कारण माझ्या उंचीमुळेच मला वगळण्यात आले होते. मी मनात बाबांना म्हणालो की मला एन. सी. सी. मध्ये प्रवेश मिळाला तर मी हा लेख साईलीला या मासिकात सादर करेन.

नंतर आम्हाला सरांनी सोमवारी स. ८-३० वाजता बोलावले. मी बाबांची उदी लावून साईबाबांचे नामस्मरण करीतच शाळेत गेलो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे मला एन. सी. सी. च्या सरांनी पटकन घेतले. मी मनातल्या मनात साईबाबांचे आभार मानले. मला हे साईबाबांच्या दोन वचनामुळेच लाभले.

'दुःख संकटे आलीत जरी
करू नका कधीच फिकीर
ठेवा अंतरी श्रद्धा, सबुरी
आपोआप निवारील शिरडीचा फकीर'

# असाच हाही एक अनुभव

—कु. आशिष वि. हजारे
(वय वर्षे तेरा)
सी/६, गुंफादर्शन फर्स्टकार्टर रोड,
बोरीवली, (पूर्व) मुं. ४००,०६६

[बोरीवलीचे साईभक्त व साई साहित्याचे एक लेखक श्री. विजय हजारे यांचा हा तेरा वर्षाचा मुलगा आपला एक अनुभव सादर करीत आहे.]

● साईबाबा जरी हे शरीर टाकून गेले तरी ते सदा आपल्यामध्ये असतात. कुठल्याही रूपात येऊन ते भक्तांना सहाय्य करतात आणि त्यांचे संकट निवारण करतात. हे त्यांच्या खूप गोष्टी वाचून सिद्ध होते. आता माझेच एक उदाहरण सांगतो. मी जेव्हा माझ्या वडिलांबरोबर पहिल्यांदाच म्हणजे पाच एक वर्षांपूर्वी श्री साई-संमेलनाच्या निमित्ताने शिर्डीला गेलो होतो तेव्हाची ही हकीगत. तशी त्यावेळी मला सकाळी उठायची सवय नव्हती. कारण माझी शाळा दुपारची असल्याने तो प्रश्नच येत नव्हता. माझे भाई (म्हणजे माझे वडिल) तर सकाळीच उठून बाबांची काकड आरती करून त्यांना अभ्यंग स्नान घालून मोकळे झाले होते. मी नेहमीप्रमाणे आठ साडेआठला उठलो. तेव्हा ते सगळे काही उरकून सम्मेलनासाठी मंदिरात गेले होते. मी माझी सर्व कामे भराभर आटोपली आणि मंदिरात गेलो. बाबांचे दर्शन उदी, प्रसाद घेऊन मी तेथून बाहेर पडलो. तेथून द्वारकामाई, चावडी पाहून माझी स्वारी लेंडीबागेकडे वळली. तेथील दत्तमंदिर, बाबांच्या श्यामसुंदर ह्या घोड्याची समाधी पाहून झाल्यावर मी जरा इकडे तिकडे फिरत होतो. थोड्याच वेळात मी माझ्या धुंदीत चालत चालत खूप दूर आलो होतो. सूर्य डोक्यावर आला होता आणि ऊन तापत चालले होते. दुपार जसजशी होत होती. तसे पोटात कावळे ओरडू

लागले होते. मी होतो तेथून फक्त मंदिराचा कळस अर्धवट दिसत होता. मी किती दूर आलो होतो ह्याचा मला अंदाज येईना. मी त्यावेळी तसा मोठाही नव्हतो. माझा चेहरा भुकेनी आणि रस्ता चुकल्याचे कळल्याने रडवेला झाला होता. तेथे तशी रहदारीही नव्हती. तो निर्मनुष्य भाग पाहून मी अधिकच घाबरलो. त्यावेळी मी बाबांचा श्रद्धेने व भक्तीने धावा केला. तितक्यात मी एका शेतकऱ्याला समोरून येताना पाहिले. बाबांचे नाव घेतच मी त्याच्याकडे धाव घेतली. मी त्याला विचारले की, " येथून साईबाबांच्या मंदिराकडे जाण्याची वाट कोणती ? "

त्या शेतकऱ्यालाही तेथेच जायचे होते. त्याने मला त्याच्याबरोबर चलण्यास सांगितले. ते ऐकून मला जरा धीर आला. आम्ही थोड्याच वेळात एस. टी. स्थानकाच्या परिसरात आलो. तो शेतकरी एका पायवाटेने चालत गेला आणि दिसेनासा झाला. मला आश्चर्य वाटले. मी पळत पळतच गुरुस्थानाजवळ जेथे आम्हाला रूम मिळाला होता तेथे आलो तर मी पाहिले माझे भाई घाबरून कासावीस होऊन बाबांचा धावा करीत मला शोधत होते. मी भेटताच त्यांना हायसे वाटले. रडत रडतच मी ती घडलेली सर्व हकीगत त्यांना सांगितली. ती ऐकल्यावर माझी समजूत घालीत माझी पाठ थोपटीत ते म्हणाले,

" अरे ! तो शेतकरी बाबांशिवाय दुसरा कुणीही नव्हता. " आणि त्यांनी गुरुस्थानातील बाबांच्या चरणावर डोके टेकले.

त्याच क्षणी मला वाटले की, ' हे आपल्याला आधीच कळले असते तर...!'

★


# श्री साईबाबा संस्थान, शिर्डी तर्फे

## ....भव्य कुटुंब नियोजन विनाटाक्याची शस्त्रक्रिया शिबीर....

श्रीसाईबाबा संस्थानचे वतीने प्राथमिक आरोग्य केन्द्र, राहाता ( जिल्हा परिषद अहमदनगर ) यांचे सहकार्याने दि. १३ ते १५-८-८१ अखेर भव्य कुटुंब नियोजन विनाटाक्याचे शस्त्रक्रिया शिबीर घेण्यात आले.

सदर शिबीरात लॅपरोस्कोप या संस्थानने नुकत्याच परदेशातून आयात करून मागविलेल्या आधुनिक उपकरणांच्या सहायाने एकूण २४० कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया ( विना टाक्याच्या ) बारा तासात करण्यात आल्या.

शिबीरार्थी व त्यांचे बरोबरचे नातेवाईक यांची संस्थान तर्फे विनामूल्य चहा, भोजन व निवासाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच शासकीय अनुदान प्रत्येक रुग्णास रु. ७०-०० देण्यात आले. संस्थानकडून रुग्णास साडी व ब्लाऊज पीस भेट म्हणून देण्यात आले.



रुग्णांवर शस्त्रक्रिया कर्म करण्यापूर्वी

शिबीरातील शस्त्रक्रिया डॉ. श्री. व सौ. माळेराव, नांदेड डॉ. सौ. नीला जोशी मुंबई, डॉ. श्री. व सौ. पाठक अहमदनगर, डॉ. सौ. शैलजा निसळ, अहमदनगर आणि संस्थानचे चीफ मेडिकल ऑफिसर डॉ. पी. व्ही. साने, औरंगाबाद यांनी यशस्वी पार पाडल्या.

शिबीरासाठी डॉ. चौहाण, जिल्हा शल्य चिकित्सक, डॉ. ताहेर जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे सक्रिय सहकार्य मिळाले.

शिबीर यशस्वी होण्यासठी निवासी वैद्यकाधिकारी डॉ. पी. यू. जोशी, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्र. श्री. देशपांडे व राहाता प्राथमिक आरोग्य केन्द्राचे डॉ. गुंजाळ व आसपासच्या प्राथमिक आरोग्य केन्द्रातील डॉक्टर्स व परिचारिका आणि शिरडी होमगार्डस प्रभारी अधिकारी श्री. कोटस्थाने व इतर होमगार्डस यांनी विशेष परिश्रम घेतले.




संबंधितांचे आभारप्रदर्शन

रुग्ण

संस्थानचे कोर्ट रिसीव्हर श्री. क. हि. काकरे, मुख्य लेखाधिकारी श्री. वि. श्री. आपटे आणि शासकीय अधीक्षक श्री. द. चिं. पाठक यांनी रुग्णांची जातीने विचारपूस केली.

याच शिबीरात संस्थान रुग्णालयातील रक्तपेढीसाठी रक्तदान करणारांचा गौरवपूर्वक उल्लेख करून त्यांना प्रमाणपत्रे देणेत आली.

★



रुग्णाईतांवरील शस्त्रक्रिया कर्म झाल्यानंतरची विचारपूस

# दर्शन

देई भेट तू शिरडीवाला
मनोभावे आळवितो तुला ॥ १ ॥
मला तुजविण कोण तारील
भक्तीमार्ग मज कोण दाखविल ॥ २ ॥
साईबाबा शिरडीवाले
तुमचीच ना हो आम्ही मुले ॥ ३ ॥
तू लवलाही देशील दर्शन काय
साई तूच ना रे माझी माय ॥ ४ ॥
मी तर तुझा भक्त भोळा
करी कृपा रे साई वेल्हाळा ॥ ५ ॥
सांगे राहूल, सुखशांती ते सकळा
सदासर्वदा वाटो, तुझाच रे जिव्हाळा

—राहूल खानविलकर, लोनावळा

◆◆◆◆◆◆

# ॥ बोला जय साई साई ॥

( अष्टाक्षरी काव्य )

बोला जय साई साई
मनी ध्यानी ठेवा साई
भक्ती जपा श्री साईची
साई पावेल तुम्हासी ॥ १ ॥
नाम घेता साई साई
क्षीण मग सर्व जाई
संकटी येई श्रीसाई
नाम घ्यावे साई साई ॥ २ ॥

—कुमारी यामिनी प्र. कोलमकर
१९ क, गुंफादर्शन, दत्तपाडा, बोरीवली ( पूर्व ) मुं. ६६

# 'साईनाथ साईनाथ' करावे नमन

'साईनाथ साईनाथ' करावे नमन
वाचावी साई गोड फुलते जीवन ॥ १ ॥

आनंदी आनंद सौख्याचे आगर
साईचे वचन प्रेमाचा सागर ॥ २ ॥

पांखर मायेची घालते माऊली
साईचे वचन वत्सल साऊली ॥ ३ ॥

कृतीला आणते आगळे वळण
साईचे वचन मंगल पावन ॥ ४ ॥

भावाला पोसते साईला पूजते
साईचे वचन जागते, नांदते ॥ ५ ॥

आणते बहर उन्मेष उदार
साईचे वचन संस्कृती साकार ॥ ६ ॥

भीतीला जाळते नीतीला पाळते
साईचे वचन शीलाला शोभते ॥ ७ ॥

वीराची शूरता धीराची वीरता
साईचे वचन टाळते क्रूरता ॥ ८ ॥

भेदाला भेदूनी वादाला लंघूनी
साईचे वचन चमके दामिनी ॥ ९ ॥

काळाला जिंकून जीवाला पाळून
साईचे वचन दाखवी जगून ॥ १० ॥

—कु. नेत्रांजली नारायण दोशी
मु. पो. निजामपूर ता. माणगाव
जिल्हा रायगड वय ११ वर्षे

# साईबाबांचे श्रीमुख पाहू या

शिरडीला जाऊं या। साईनाथ घेऊ या
श्रीमुख पाहूं या रे, पाहू या श्रीमुख पाहू या रे ॥ १ ॥
मन माझे हे शांत बसे हो मंदिरी जाऊनी
साक्षात् मूर्ती ती गुरुदेवाची ठेवूनी अंतरी
चटणी भाकर खाऊ या रामनाम गाऊ या
श्रीमुख पाहूं या रे ॥ २ ॥
दुःखी मनाला मोक्ष हवा तर शिरडीला जावे
तन मन धन लावुनी नाम गुरुदेवाचे ध्यावे
शांततेने बैसुनी, साई नाम घेऊनी
सेवेसाठी धावूं या रे ॥ ३ ॥
शिरडी नगरी धन्य झाली। श्रीगुरुच्या चरणाने
संकटे सारी पळती श्रीच्या नामस्मरणाने
मोक्षपदा पाहूं या रे ॥ ४ ॥

—कु. नीलम नारायण दोशी
वय ९ वर्षे
मु. पो. निजामपूर, ता. माणगाव
जि. रायगड

---

# माझ्या साई

अरे माझ्या साअी
माझ्या घरी येअी
मी तुझ्याशी कधी
चुकूनही भांडणार नाही

—हेमंत गजानन कुळकर्णी
वय ११ वर्षे
'कुलदीप' तांबरी
उस्मानाबाद ४१३५०१

# मशिदीत प्रगटला साई जगदिश्वर

( साईलीलेचे पिंपरीचे कवी श्री. डी. व्ही. पोतनीस व कवयित्री सौ. प्रमोदिनी पोतनीस यांचा हा बालकवी पुत्र )

एके दिवशी सुप्रभाती
झाला चमत्कार
मशिदीत प्रगटला साई जगदिश्वर ॥ धृ. ॥

सतेज काया हासरे वदन
कमल नयन अन कोमल चरण
कोटी सुर्यांची प्रभा पसरली शिरडी गावावर
मशिदीत प्रगटला साई जगदिश्वर ॥ १ ॥

नाव गाव ना ठावे कोणा
कैसा कोठुनी आला राणा
कोटी जनांची रीघ लागली शिरडी गावावर
मशिदीत प्रगटला साई जगदिश्वर ॥ २ ॥

लज्जे पुरती फाटकी कफनी
अंगावरती बसे घालुनी
कोटी दौलत वाटत राहिला शिरडी साईश्वर
मशिदीत प्रगटला साई जगदिश्वर ॥ ३ ॥

श्रद्धा सबुरी अन्ती धरूनी
अखंड चिंतन करावे मनी
कोटी कोटी भक्तांना देईल जन्मभर भाकरी
मशिदीत प्रगटला साई जगदिश्वर ॥ ४ ॥

—राजन डी. पोतनीस
२६/७ एच. पो. पिंपरी पुणे १७

# साई माझा

ताऱ्यात चंद्र जैसा
शिर्डीत साई तैसा
संतात संत ऐसा
साईच श्रेष्ठ माझा

वृक्षात श्रेष्ठ आम्र
अवतार भूवरी हा
शिर्डीमध्ये वसे हो
साई महान देव

पुष्पात श्रेष्ठ पुष्प
तो पारिजात वाटे
धरणीवरी तसा हा
साईच दिव्य वाटे

म्हणून वाकवी मी
ही मान साईपायी
लागो न अन्य ध्यास
लागो इमान पायी

ह्या सौरभास त्याने
सांभाळुनी ही घ्यावे
ऊणे असेल काही
तिकडे न लक्ष द्यावे

—कु. सौरभ अरुण शहाणे
लक्ष्मी निवास, गडकरी रोड,
डोंबिवली ( पूर्व ) इयत्ता ८ वी

# माझे साईबाबा

श्री साईबाबा – तुम्ही माझे आईबाबा।
श्री साईनाथा – तुमचे चरणी माझा माथा॥
श्री गुरुराया – सदैव असो तुमची माया।
श्री गुरुब्रह्मा – सदैव असो तुमच्यावर माझी श्रद्धा॥

वंदिते तुम्हाला चराचर सृष्टी
माझ्यावर असो तुमची कृपा दृष्टी॥
श्री साईबाबा तुम्ही ब्रह्मचारी
भवसागरांतुन तुम्हीच तारी॥
तुमची योगमाथा – कधी न जाईल वाया॥

शिरडी तुमचे ठिकाण –
धावाल भक्तांसाठी असो कोणतेही ठिकाण
नवस बोलले कधी कुणी–
नवसास पावाल लगेच तुम्ही॥
पण श्रद्धा आणि सबुरी
ही लागते अंतरी॥

–कु. जम्बू उर्फ सत्येंद्र कुलकर्णी
(वय १० इ. ६ वी)
फलटण जि. सातारा

# ॥ पूजा करुंगा केवल तेरी ॥

देख शिरडी को चकित हुआ मैं,
देख मूर्ति को चकित हुआ मैं,

समझ न सका अपार महिमा तेरी साईं
लगा उदी को चकित हुआ मैं ॥

बालक हूँ, क्या करुंगा तेरा ध्यान,
क्यों करू मैं व्यर्थ भक्ति अभिमान,

तू केवट मेरा, विद्या केवल दे दे,
बुद्धि दे मुझे, कहूँ मैं सदा साईं राम ॥

श्रद्धा सबुरी, दो जानता हूँ मैं,
शिरडी आना भी चाहता हूँ मैं,

और साधना क्या मैं जानूं कैसे कहूँ,
फकिरी में राजा को देखताहूँ मैं ॥

मुझे कुछ बनादे, बनादे, बनादे,
तेरी याद में मरना चाहता हूँ मैं ॥

—कुमार दिपक पटवारी
घ. नं. ३–२–५१ ब्राह्मणवाडी, बिदर ५८५४०१

★

# साई महिमा

या हो या, सारे या
साई महिमा गाऊया ॥ धृ० ॥

संकट काळी धावुनी येती
भक्तांचा रे उद्धार करती
चुकलेल्यांसी माफ करती
असेच आपुले साई असती ॥ १ ॥

जे जे गेले शिरडीशी
रमले त्यांच्या चरणाशी
अनुभवे थक्क होऊनी
स्वानंदे परते माघारी ॥ २ ॥

भार आपला टाकुनी मजवरी
निश्चित राहा आपुल्या स्थानी
जरी मी गेलो, तरी धावेन तुम्हांसाठी
असेच साई नित्य वदती ॥ ३ ॥

—कुमार अतुल चाबरे
५ वसंत भुवन, चितळेपथ, दादर २८

★

## वंदन करूनी प्राण सोडीला साई चरणांवरी-(१९)

अशाच एके दिवशी एक दरवेशी गावोगावी खेळ करीत शिर्डीला आला. त्याच्याकडील व्याघ्र पिसाळला होता. तो अन्नग्रहण करीत नव्हता. अशा बिकट परिस्थितीतून दरवेशाने एक मार्ग काढला होता. पिसाळलेला तो व्याघ्र श्रीसाईंच्या चरणांवर घालावा, व त्याला कायमचा बरा करावा. श्री साई माऊलींच्या आशिर्वादाने माणसे बरी होतात तर हा मुका प्राणी निश्चित बरा होईल. अशा भोळ्या समजुतीने भारावून दरवेशाने व्याघ्राला साई चरणी आणला. श्री साईंच्या आज्ञेवरून त्याला शृंखला मुक्त करण्यात आले. मुक्त झालेला तो व्याघ्र एकाद्या भक्ताप्रमाणे धावत साईचरणावर गेला. आपले पुढील दोन्ही पाय साई चरणांवर ठेवून त्याने शिरसाष्टांग नमस्कार केला. डोक्यावर साईंचा हात फिरताच त्या व्याघ्राने आपले पंचप्राण अनंतात विलीन केले, आणि साई चरणांवर मुक्ती मिळविली.

### वंदन करूनी प्राण सोडीला, साई चरणावरी

सद्गुरु मुक्ती द्या हो लवकरी ॥ ध्रु ॥

गावोगावी खेळ खेळले
दरवेशाचे पोट जाळले
ऋणमुक्तीचे दिस संपले, साई चरणावरी ॥ १ ॥

धन्य अहिल्या शापित झाली
युगे युगे ही वाट पाहिली
पद स्पर्शाने पावन केली. श्री हरी चरणावरी ॥ २ ॥

शिर्डी क्षेत्री व्याघ्र खवळला
वनराजाने मार्ग बदलला
दरवेशाने व्याघ्र आणिला, साई चरणावरी ॥ ३ ॥

साई पहाता व्याघ्र नमला
वंदन करुनी प्राण सोडीला
गत जन्मीचे पुण्य लाभले,साई चरणावरी ॥ ४ ॥

साई प्रभुंची ओढ लागली
अंतःकाळी प्रभा उमलली
सद्गुरु चरणी भेट जहाली, साई चरणावरी ।। ५ ।।

साई हस्ते कबर बांधिली
शिर्डी क्षेत्री अमर जाहली
शिवप्रभुचा नंदी जाहला, साई चरणावरी ।। ६ ।।

## आज द्वारी याचक आला, ब्रम्ह मागण्याला-(२०)

दानशूर कर्णाचा उपयोग जगाने दानच घेण्यासाठी करावा, आणि प्रसन्न झालेल्या साई माऊलीकडून कुणीही यावे व आपले मनोरथ पूर्ण करून घ्यावे ही तर ख्याति होती. ह्याचा आपण फायदा घ्यावा म्हणून एक एक श्रीमंत लोभी ब्रम्ह मागण्यासाठी साई जवळ आला. श्री साईंनी एक नवीन मार्ग काढला. एका लहान मुलास उसने पाच रुपये आणावयास पाठविले. काही वेळाने तो रिक्त हस्ते परत आला. पुन्हा तो प्रकार साईंनी केला. त्याही वेळेस तीच पुनरावृत्ती झाली. तेवढ्यात साईंनी त्याच्याकडे दुर्लक्ष केलेले पाहून धनिकाने ब्रम्ह मागण्यास सुरवात केली, आणि त्याच क्षणी अधिकार वाणीने साई सांगू लागले. अरे धनिका खिशात अडीचशे रुपये असून सुद्धा त्यातील पाच रुपये साईला देवू शकत नाही. तर ब्रम्ह घेवून जगाला काय देणार. हे बोल ऐकताच तो धनिक कायमचा मार्गी लागला.

आज द्वारी याचक आला, ब्रम्ह मागण्याला
चार हि धामे यात्रा करूनी, साईचरणी आला ।। ध्रु. ।।

स्थितप्रज्ञ ते साई पाहूनी
योग मनीचे आले जुळूनी
कथा आपुली पुढे सांगूनी
कृपावंत आज होवूनी
कृतार्थ होवू दे मम जीवनी काय योग आला ।। १ ।।

समोर हासरे बालक पाहूनी
उसने पैसे आण सांगूनी
पांच रुपये गरज दावूनी
शांत बैसे ब्रम्ह चिंतनी
रीक्त हाताने येई परतूनी, नाही कोण भेटला ।। २ ।।

पुन्हा एकदा आज्ञा करुनी
दुसऱ्या द्वारी बालक धाडूनी
कोण नसे हो घरी भेटूनी
नैराश्येने बालक येवूनी
खेळ साईंनी सारा रचुनी, मार्ग कसा काढला ॥ ३ ॥

किती वेळ येथे बैसुनी
ब्रम्ह द्यावे मज आणूनी
किर्ती मिळू दे मम जीवनी
वंदन करी तो नम्र होवूनी
अति आनंदे साई हासुनी, बोध करी त्याला ॥ ४ ॥

अडीच शतके रुपये असुनी
संत इच्छा मनी जाणूनी
पांच रुपये ते नाही देवुनी
कृपण मी तो साऱ्या दावूनी
ब्रम्ह घेवून काय देशी, साऱ्या जगताला ॥ ५ ॥

–श्री. सुहास देसाई
सी. जी. एस. कॉलनी, बिल्डिंग नं. १९०
ब्लॉक नं. १९४०, अँटॉप हिल, मुं. ३७

## कै. बाळकृष्ण दीक्षित साईचरणी विलीन

भगवान श्री साईबाबांचे परमभक्त व साईबाबांच्या सहवासात बराच काळ घालविलेले मुंबापुरीचे रहिवासी कै. हरी सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षित यांचे चिरंजीव श्री. बाळकृष्ण यांचे सोमवार दिनांक १४ सप्टेंबर १९८१ रोजी विलेपारले मुंबई येथे निधन झाले.

श्री साई मृतात्म्यास सद्‌गती व शांती देवो.

# शिरडी–वृत्त माहे ऑगस्ट सन १९८१

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी नेहमी प्रमाणे होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे:—

**कीर्तन** :– १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमी प्रमाणे महत्वाचे दिवशी झाली.
२) श्री. दत्तात्रय दा. रासने यांचे कीर्तन झाले. ( पुणे )
३) ह. भ. प. सदाशिव बुवा पुराणीक यांचे कीर्तन झाले. ( आळंदी )

**प्रवचन** :– १) श्री. निवृत्तीराव गोंदकर शिरडी.
२) श्री. रघुनाथ कृ. कारखानीस पुणे.

**भजन, गायन, वादन :– नृत्य, वगैरे** १) श्री. तुलशीदास भजन मंडळी. उल्हासनगर. २) श्री. पूज्य गुरुदेव बैतूल.
३) सर्वश्री गजानन प्रासादिक बालमित्र भजन मंडळी. खारदांडा. ४) सौ. मालती म. कुलकर्णी कोल्हापूर. ५) कु. अमित म. कुलकर्णी. ६) कु. अश्विनी म. कुलकर्णी ७) किशोर जी. देवळे. बडोदा. ८) श्री. ह. भ. प. दरिया भजनी मंडळ, मुंबई. ९) सौ. सुनंदा भा. देशमुख मुंबई. १०) भालचंद्र वि. देशमुख. ११) कु. योगिनी देशमुख. १२) सिकपायतन नृत्य पथक, मुंबई. १३) सुधाकर ना. कामतेकर, मुंबई. १४) बनेश य पंडीत मुंबई. १५) अनुराग श्रीवास्तव मुंबई. १६) मनोहर राय दादर. १७) आप्पासाहेब ग. पागे कोळपेवाडी. १८) कु. विमलताई भा. शिर्के. जळगाव. १९) स्वामी संजयानंद २०) सौ. मीनाबाई संजयानंद बद्रीधाम. २१) सौ. शरयू सा. मराठे शिरडी. २२) भोलानाथ समेळ मुंबई. २३) परेश कुमार छ. देसाई सुरत.

**स्वराज्य प्राप्तीदिन** :– शनिवार १५ ऑगस्ट १९८१ रोजी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी तर्फे कोर्टरिसीव्हर माननीय श्री. क. हि. काकरेसाहेब यांचे शुभ हस्ते प्रतिवर्षी प्रमाणे ध्वज वंदनाचा कार्यक्रम, श्रींचे मंदिरावरील कळसा जवळ झाला. कार्यक्रमास संस्थान कर्मचारी, श्रीसाईनाथ हायस्कुल बॅण्ड पथक, शिक्षक वर्ग, होमगार्डस, पोलीस, विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्रतिष्ठीत–ग्रामस्थ मंडळी, साईभक्त, पाहुणे मंडळी उपस्थीत होती. कार्यक्रम संपल्यावर सर्वांना चहापान देण्यात आले व मुलांना खाऊ वाटण्यात आला. रात्रौ समाधि मंदिर व श्रींच्या कळसावर रोषणाई करण्यात आली होती.

**श्रीकृष्ण जयंती :–** शनिवार दि. २२–८–८१ रोजी नित्याचे कार्यक्रम झाल्यावर रात्री ९ ते १०–३० पर्यंत स्थानिक कलाकार व संस्थान कलाकारांचे कार्यक्रम झाले. १०–३० ते १२ पर्यंत संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांचे कृष्ण जन्मावर कीर्तन झाले. त्यानंतर शेजारती झाली व सर्वांना तीर्थ प्रसाद वाटण्यात आला. रात्री समाधि मंदिर व श्रींच्या कळसावर रोषणाई करण्यात आली होती. दुसरे दिवशी गोपाळकाला, कीर्तन, दही हंडी कार्यक्रम झाल्यावर रात्री श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आली त्यानंतर शेजारती झाली.

**हवा पाणी :–** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पावसाचे प्रमाण कमी आहे.


## जगातील सर्वात स्वस्त एकमेव दिवाळी अंक

### श्रीसाईलीला दिवाळी अंकातील आकर्षणे

☆ महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री. ओ. पी. मेहरा यांची श्रीसाईबाबा विषयक रंजक मुलाखत व अनुभव—लेखक–साईनंद

☆ शिरडीतील विविध उत्सवांच्या जन्मकथा आणि उत्सव प्रसंगीचे सोपस्कार

☆ सुमारे पन्नास भक्तांचे श्रीसाईविषयीचे वाचनीय अनुभव, मोहक संमोहक मुखपृष्ठ : पाने १२८ किंमत २ रुपये